लेसा–(लेश्या) क्रोधमानादि कषायांनी अनुरंजित अशी चित्तप्रवृत्ति म्हणजे लेश्या. कृष्ण, नील व कापोत या अशुभलेश्या असून पीत, पद्म व शुक्ल या शुभलेश्या आहेत. या लेश्यांना सहा प्रकारच्या प्रवाशांची उपमा दिली आहे. फळांनी बहरलेलें झाड पाहून त्यांच्यात खालील मनोभाव निर्माण होतात–कृष्ण लेश्याधारी मूळापासून झाड तोडून फळे खाण्याची इच्छा करतो, नीललेश्याधारी फळाकरिता स्कंध तोडावा म्हणतो, कापोत–लेश्याधारी मोठमोठ्या फांद्या तोडू इच्छितो, पीतलेश्याधारी डहाळ्या तोडाव्या म्हणतो, पद्मलेश्याधारी हवी तितकी फक्त फळें तोडू इच्छितो, तर शुल्कलेश्याधारी केवळ आपोआप तुटून खालीं पडलेलींच फळें घेतो. अशा रीतीने मनपूर्वक वचन आणि कार्याची जी प्रवृत्ति होते ती म्हणजे लेश्याचें कर्म होय.

पंचसमिति–आपल्या देहापासून अन्य जीवांना पीडा होऊ नये म्हणून मुनि व आर्यिका दक्षतेने क्रिया करतात, त्यास समिति म्हणतात. ही दक्षता पांच गोष्टींत ठेवावयाची असते. जीवरक्षण व संयमाची काळजी घेण्या–करिता चालताना (ईर्या), बोलताना (भाषा), आहार घेताना (एषणा), एकादी वस्तू घेताना किंवा ठेवताना (आदान निक्षेपण) आणि मलमूत्र विसर्जन करताना (उत्सर्ग) त्यांनी सावधानपूर्वक वागावे.

तिगुत्ती– (त्रिगुप्ति) गुप्ति म्हणजे संरक्षण. मन, वचन व काय यांच्या व्यापारांना रोकून आत्मशक्तीचें संरक्षण करणें ही तीन प्रकारची गुप्ति होय.

९. पडिनियत्त–(प्रतिनिवृत्) परत फिरणें. मुण–(देशी)–जाणणें.

१०. दंति–(दन्तिन्) हत्ती. अइरेण–(अचिरेण) लौकर.

११. चरिमजाम–(चरिमयाम) शेवटचा प्रहर. कप्पडिय–(कार्पटिक) भिकारी. छायणिया– (छादनिका) शेकरणी. आवज्जिय– (आवर्जित) आपलेसे करणें. वपुः–शरीर.

१२. नुवण्णो (देशी)–झोपला.

१३. कालगओ– (कालगतः) मरण पावला. पुंडरीय–(पुण्डरीक) छत्र.

पंच दिव्वाणि– (पञ्चदिव्यानि) एकादा राजा निपुत्रिक मरण पावला म्हणजे ज्या पांच दैवी गोष्टींनी राजाची निवड केली जाते त्यास

पांच दिव्ये म्हणतात. येथे वेणातटीतील राजा निपुत्रिक मरण पावल्याने हत्ती, घोडा, कलश, चवरी आणि छत्र हीं पांच दिव्यें अभिषिक्त केलीं. हीं दिव्यें नगरामध्ये फिरून मूलदेवापाशीं आली. हत्तीने गर्जना केली, घोडा खिंकाळला, कलशाने अभिषेक केला, चवऱ्या ढळू लागल्या आणि छत्र त्याच्यावर राहिलें. तेव्हा लोकांनी जयजयकार करून मूलदेवाचा राजा म्हणून स्वीकार केला.

१४. खिज्ज–(खेदय्) त्रास देणें. खलीकर–(खली + कृ) अपमान करणें. अंबाड (देशी)–शिव्या देणें, निर्भत्सना करणें. पडिखद्धेण–(प्रति–खादितेन) ठार केल्याने. ऊणिमा–(ऊनिमा) उणीव.

१५. कोसल्ल–(कौशल्य) भेट, देणगी, कुशलता.

१६. विढव– (विढव) मिळवणें. पच्चाभिन्नाओ– (प्रत्यभिज्ञातः) ओळखला गेला. उवरिगो - (उपरिकः) मोठा अधिकारी. पोप्फलं–(पूगफलम्) सुपारी. चोल्लय–(चोलक) पेटी.

१७. विभासा–(विभाषा) शक्यता, शंका.

३. करकंडु

१. ओलुग्गा जाया– (अवरुग्णा जाता) उदास किंवा कष्टी झाली. अज्झाहओ–(अध्याहृतः) भारला गेला.

२. महइमहालय– (महतिमहालक) मोठें, विशाल. परिणइ–(परिणति) परिणाम. अप्पमत्त–(अप्रमत्त) दक्ष. दोघट्ट–(देशी) हत्ती.

चउसरण– (चतुशरण) जैनदर्शनामध्ये चार आश्रयाचीं ठिकाणें मानली आहेत ती अशी– १. अरिहंत (सर्वज्ञ, निर्दोषी व हितोपदेशी), २. सिद्ध (८ कर्मांचा नाश करून शुद्ध स्वरूपांत सिद्धशिलेवर विराजमान झालेले परमात्मे), ३. साधु (संसाराचा त्याग करून मोक्षमार्ग अवलंबिणारे) आणि ४. केवलि प्रभूंनी हितोपदेशिलेला सत्य धर्म. संकटाच्या वेळीं वरील चार गोष्टींचा आश्रय करावयाचा असतो.

कम्मट्ठ–(कर्माष्ट) जैनदर्शनामध्ये कर्म ही पौद्गलिक शक्ति आहे. इंद्रियविषयामुळे क्रोध, मान, माया व लोभ या अनंतानुबंधी कषायांच्या वशिभूत झाल्यामुळे आत्म्यांत परिस्पंदन होऊन मन, वचन, काय योगद्वारे

कर्मवर्गणा येऊन आत्म्यास बंध होतो. अशा रीतीने अनंतचतुष्टयात्मक (अनंत दर्शन, अनंत ज्ञान, अनंत वीर्य व अनंत सुख) आत्मशक्ति दडपली जाते. हे कर्म आठ प्रकारचें आहे. घातिकर्म - १ ज्ञानावरणीय, २. दर्शनावरणीय, मोहनीय, अंतराय, अघातिकर्म-५. आयु, ६. नाम, ७. गोत्र व ८. वेदनीय. प्रत्येकाचे विविध पोटभेद आहेत. केलेल्या शुभाशुभ कर्माचें बरेंवाईट फळ भोगल्याशिवाय जीवाची त्यांतून सुटका होत नाही.

३. नियल्लय- (निजक) प्रजाजन, सेवक. पवत्तिणी- (प्रवर्तिनी) प्रमुख साध्वी. अपवग्ग-(अपवर्ग) मोक्ष, निर्वाण. मयहरिया-(महत्तरिका) प्रमुख साध्वी. सुसाण किंवा मसाण-(श्मशान) स्मशान. पाणी- (देशी) चांडाळ. डिंभ-(डिम्भ) मूल. लुक्खकच्छू-(रूक्षकच्छू) वाळलेली खरूज. कंडूय- (कण्डूय) खांजळणें.

४. संजय-(संयत) मुनि. आयंक- (आतङ्क) रोग. समूसिय- (समूच्छित) उंची, लांबी. पोल्लड - (देशी) पोकळ. निद्ध- (स्निग्ध) तेलकट. धिज्जाइय-(धिग्जातिक) ब्राह्मण (व्यंगार्थी-हीन जातीचा मनुष्य). अप्पसारिय-(अप्रसारित) न वाढलेलें. उद्दाल- (उद्दालय) हिसकून घेणें. करण-(करण) न्यायालय. पयाहिणी-(प्रदक्षिणी) प्रदक्षिणा. हरिएस- (हरिकेश) शूद्र, चांडाळ उस्सार (उद्सारय) बाजूला नेणें.

५. विसाण-(विशाण) शिंग. परिघट्टण-(परिघट्टन) आक्रमण, हल्ला गंधवसह-(गंधवृषभ) उत्कृष्ट जातीचा सामर्थ्यशाली बैल. याला. पहातांच बाकीचे बैल घाबरून पळून जातात.

६. अधुवो-(अधृवः) अस्थिर. पंसु-(पांसु, पांशु) धूळ. खरउ- (क्षरित) नष्ट होणें. थेरत्त-(स्थविरत्व) म्हातारपण. लिंग-(लिङ्ग) उपकरणें, चिन्ह. समिक्ख- (सम+ईक्ष) अवलोकन करणें, गुणदोषांचें चिंतन करणें, जाणणें.

पत्तेयबुद्ध-(प्रत्येक बुद्ध) आत्मिक जागृतिकरितां ज्यास एकादें बाह्य निमित्त कारणीभूत व्हावें लागतें अशा असामान्य स्वयंस्फूर्त ज्ञानी मुनीस प्रत्येक बुद्ध किंवा स्वयंसबुद्ध असें म्हणतात. यांना इतरांच्या उपदेशाची गरज लागत नाही.

□ □ □

मराठीं भाषांतर

१. द्वारवतीचा विनाश

१. द्वारवती नांवाची नगरी होती. ती देवकृत, संपूर्णपणे सौन्यार्चा तयार केलेली आणि सर्व महाऐश्वर्याने संपन्न अशी होती. त्याठिकाणीं भारताचा अर्धचक्रवर्ती वासुदेव राजा रहात होता. बलदेव आणि जराकुमार हे त्याला भाऊ होते. ते दोघेहि वडील होते. वसुदेव त्यांचा पिता. त्याची राणी जरा. तिचा मुलगा म्हणून (त्यास) जराकुमार (म्हणत असत). विचार (मनांत) येतांच ज्यांचे मनोरथ पूर्ण होत, असे ते (तिघेहि) शांब, प्रद्युम्न, इत्यादि साडेतीन कोटी राजपुत्रांसह आणि शेकडो हजार सुंदरींच्या परिवारांत राज्य आणि वैषयिक सुख उपभोगूं लागले.

२. आतां एकदां सर्वज्ञ भगवान अरिहंत अरिष्टनेमि प्रभु भव्य-जनांना हितोपदेश करण्याकरिता त्याठिकाणीं आले. देवांनी समवसरणाची रचना केली. कल्पवासी, ज्योतिष्क, भवनवासी आणि व्यंतर असे चार प्रकारचे देव यादव आणि वासुदेव (उपदेश श्रवण करण्याकरिता) आले. भगवंतांनी धर्मोपदेश केला. त्यावेळीं प्रवचनाच्या शेवटीं वासुदेवाने विचारलें, "भगवन्, संपत्ति, सुवर्ण, रत्न, देश, रथ आणि अश्व यांनी संपन्न व देव-निर्मित द्वारवतीचा, यादवकुलाचा आणि, माझा नाश कोणाकडून आणि कोणत्या कारणाकरितां होणार आहे?" भगवान म्हणाले, "राजा, ऐक. द्वीपायन नांवाचा या ठिकाणी ऋषि आहे. दारू पिऊन मस्त झालेल्या शांबादि राजपुत्राकडून अपमानित झाल्यामुळे तो द्वारवतीनगरीचा नाश करील आणि यादवकुलाचा अंत करील. तो पूर्वी शौरीपुर नगराच्या बाहेरील तपस्व्याच्या आश्रमांमध्ये (रहाणारा) पाराशर नांवाचा तपस्वी होता. त्याला एक दुराचारी मुलगी सांपडली. तिला घेऊन तो यमुना-द्वीपामध्यें आला. म्हणून त्याला द्वीपायन म्हणू लागले. तो ब्रह्मचारी

असून केवळ सहावे जेवण जेवणारा तपश्चर्या करीत तेथे रहातो आहे. आणि त्याने असें ऐकलें, " अनंतदर्शनी भगवान् अरिष्टनेमि प्रभूंनी, खरोखर माझ्याकडून द्वारवतीचा आणि यादवांचा नायनाट होणार आहे असें (भविष्य) वर्तविलें आहे. हें केवळ दुष्कृत्य आहे. मी तें कसें करीन?" असा विचार करून तो दुसऱ्या अरण्यांत गेला. स्वतःच्या मरणाचें कारण जें तूं विचारलेस तें ऐक वसुदेवाचा जराराणीपासून झालेला हा जो तुझा जराकुमार नांवाचा वडील भाऊ आहे त्याच्याकडून तुझा मृत्यु होईल.

३. त्यावेळीं चिंतातूर आणि दुःखपूर्ण यादवांची दृष्टी जराकुमाराकडे वळली. जराकुमाराने विचार केला, " हाय ! किती दुःखपूर्ण, थरारक आहे हे! वसुदेव महाराजांचा पुत्र होऊन स्वतःच मी माझ्या धाकट्या भावाला कसे ठार करीन? अरेरे ! किती हे अघोर पाप ! " असा विचार करून जनार्दनाच्या रक्षणाकरिता यादवांचा निरोप घेऊन आणि त्यांना प्रणाम करून जराकुमाराने अरण्यवास पत्करला.

४. त्यावेळी जराकुमाराच्या जाण्याने कृष्णादि यादव स्वतःला शून्यवत् मानू लागले. नंतर भगवान् अरिष्टनेमींना वंदन करून सगळे यादव संसाराच्या, विशेषतः द्वारका नगरीच्या व यादवकुलाच्या क्षण-भंगुरत्वाचे चिंतवन करीत नगरीमध्ये (परत) आले. नगरीमध्ये आल्या-नंतर वासुदेवाने घोषणा करविली ती अशी - " मदिरादि मादक पदार्थ ताबडतोब कादंब नांवाच्या गुहेत न्या. भगवान् अरिष्टनेमि प्रभूंनी उपदेशिलें आहे की मांदरासक्त झाल्यामुळे (मद्यपानाने मदोन्मत्त होऊन) राजकुमारार द्वीपायनमुनीचा अपमान करील. (त्यामुळे) कोपाविष्ट होऊन तो द्वारवतीचा विनाश करतील. " तेव्हा आज्ञापिल्याप्रमाणे नोकरांनी सर्व कांही केले. सगळे मद्यादि (मादक) पदार्थ कादंब वनामध्ये शिलाकुंडांत टाकले. कादंबवनाने झाकल्यामुळे त्या गुहेला कादंबरी असे म्हणत. त्याच करिता मदिरेला पण कादंबरी म्हणतात.

५. अशातऱ्हेने काळ जात असताना बलदेवावरील प्रेमाने त्याचाच सारथी झालेला सिद्धार्थ नांवाचा त्याचा भाऊ त्याला मधुरपणे विनवू लागला तें असें " भगवंतांनी उपदेशिले आहे की जन्म, म्हातारपण, मरणाने

परिपूर्ण असलेला हा संसार प्रामुख्याने आम्हांला क्षणकाल टिकणारा आहे. ते हा भगवानांच्या जवळ मुनिधर्म आचरण्यास मला अनुज्ञा द्यावी," त्याचा निश्चय पाहून बलदेवाने म्हटले, "ठीक आहे, परंतु कोठेही संकटांत असताना तूं मला जागृत करावेस." "बरे" असे म्हणून आणि नातेवाईकांचा निरोप घेऊन सिद्धार्थ भगवानांच्या जवळ गेला आणि त्याने मुनिदीक्षा घेतली. मोठें तपाचरण करून केवळ सहा महिन्यातच तो स्वर्गामध्ये गेला

६) आणि इकडे कादंबरी गुहेतील शिलाकुंडांत असलेली दारू हेमंतादि सहा महिन्याच्या काळांत चांगल्या तऱ्हेने परिपक्व झाली, आणि स्वच्छ, स्वादिष्ट, उत्कृष्ठ, चित्त अल्हादित करणारी कर्केतन (रत्ना) सारख्या लाल रंगाची अशी झाली. आणि इकडे शांब राजपुत्राच्या पदरी असलेला एक शिकारी रमतगमत त्याठिकाणीं आला. त्याने ती मदिरा पाहिली आणि आनंदित होऊन तो तिचा स्वाद चाखू लागला अत्यंत स्वादिष्ट चव आहे असे पाहून तो ती ओंजळीने घटाघट पिऊ लागला. त्याने हरणांचे कळप पाहिले आणि ते पण त्या थंडगार, स्वच्छ, मधुर मद्याच्या रसाने उन्मत होऊन निर्भयपणे क्रीडा करीत होते. त्यावेळी त्याने शांबकुमारास ही हकिगत सांगितली. तेव्हा शांबकुमार (त्याठिकाणी) गेला आणि त्याने मदिरा पाहिली. ती प्राशन करून शांब विचार करू लागला, "(इतर) राजपुत्रांना सोडून कसलाहि सुखाचा उपभोग घेणे हें मला शोभतें का? तेव्हा उद्याला त्या राजपुत्रांना (हि) मी (येथे) आणीन." अविनयी राजकुमारांना त्याने कादंबरी गुहेजवळ आणलें. त्यांनी ती मोहक मदिरा पाहिली आणि "ही वरूणी घेऊन या," अशी चाकरांना आज्ञा केली. त्यांनी ती आणली. अनेक प्रकारच्या झाडावरील फुलांच्या परिमलाने सुखावह (श. सुशोभित) झालेल्या रम्य बागेमध्ये ते आले, आणि शांब म्हणाला, "हे राजकुमारानो, सहा महिन्यानंतर कसे कसे तरी करून आम्हांला ही मदिरा चाखायला मिळाली आहे. तेव्हा मनसोक्त (मदिरा) पान करा." त्यांनी ती प्राशन केली. त्यावेळीं तिच्या मदाने ते गाऊ लागले, नाचू लागले, आणि एकमेकांना मिठ्या मारू लागले, (अशातऱ्हेने) क्रीडा करीत सुंदर अशा त्या पर्वताकडे गेले. तिकडे जात असताना त्यांना तपश्चर्या करीत असलेला द्वीपायन मुनि दिसला. तेव्हा ते म्हणू लागले,

"अहो जिनेंद्र भगवान अरिष्टनेमि प्रभूंनी द्वारवतीचा विनाश करणारा म्हणून सांगितलेला हाच तो दुष्ट! तेव्हा, विनाकारण शत्रुत्व पत्करलेल्या या पाप्यास आम्ही का मारू नये?" नंतर क्रोधाने दातांनी अधर चाऊन त्या निरपराधी द्वीपायन ऋषीस ते लाथांनी बुक्क्यांनी, आणि हातांच्या प्रहारांनी, श्वास घेणेहि अशक्य होऊन तो जमिनीवर पडेपर्यंत बडवू लागले. त्याला बडवून ते द्वारवतीला (परत) गेले. वासुदेवाच्या विश्वासू नोकरांनी जसें घडलें तें सर्व सांगितलें. कृष्णाने विचार केला, "काय हा कुमारांचा अविचार! काय हा तारुण्याचा अदूरदृष्टिपणा! माझ्या जीविताप्रमाणे असलेल्या यांच्याविषयी काय करता येणार?" बलदेवाला घेऊन तो द्वीपायन ऋषीचें शांतवन करण्याकरिता गेला. त्यांनी पाहिले, क्रोधाने द्वीपायनाचे ओठ कांपत आहेत. त्यावेळी योग्य अशा आदराने त्यांनी त्याचा सत्कार केला व (कृष्ण) विनवू लागला, "हे थोर तपस्वी, क्रोध हा सर्व गुणांचा नाश करणारा आहे, म्हणून संयमी महासत्वशील (कधी) रागाच्या आधीन होत नाहीत. त्याचप्रमाणे अविचाराने मद्यपान करून मदोन्मत झालेल्या अज्ञानी माणसाच्या अपराधाचा महानुभाव विचार करत नाहीत. तेव्हा आमच्या करिता कुमारांच्या दुष्कृत्यांची क्षमा करा." अशातऱ्हेने विनवणी करूनही द्वीपायन क्रोध सोडीना, तेव्हा बलदेव म्हणाला, "हे राजन, पुरे हा प्रयत्न! जें कांही याने करावयाचें ठरविलें आहे तें करू देत. जिनेश्वरांचे बोल का विपरीत ठरतील?" तेव्हा द्वीपायन म्हणाला, "हे राजा. मला मारत असताना तुम्हा दोघांना सोडून द्वारकेच्या नाशांतून (केवळ) कुत्र्याचीहि सुटका होणार नाही अशी मी मोठी प्रतिज्ञा केली आहे. तेव्हा जिनवचन खोटें होणार नाही आणि माझी प्रतिज्ञा पण बदलणार नाही. म्हणून जा, (आतां) याचा विचार करून काय उपयोग?" त्यावेळी अत्यंत शोकाकूल व उद्विग्नचित्त होऊन वासुदेव व बलदेव नगरीकडे परतले द्वीपायनाची (घोर) प्रतिज्ञा शहरांत चोहोकडे पसरू लागली. दुसऱ्या दिवशीं (कृष्णाने) दवंडी पिटविली, "हे नागरिकजनहो, तप, उपवासमध्ये मग्न व्हा आणि आपल्या हाताने नैवेद्य, फुलें, गंध, धूपांनी जिनेंद्राचे वंदन, अर्चना व भक्ति (श. नमन) करण्यांत तत्पर रहा. भगवानांनी नगरीचा अशा तऱ्हेनें शेवट सांगितला आहे."

७) मध्यंतरीच्या काळांत पुनः भगवान् अरिष्टनेमि स्वामि विहार करीत (तेथें) आले. रैवतक पर्वतावर समवसरण रचलें. यादव (तेथे) गेले व भगवंतांना वंदन करून आपापल्या जागेवर बसले. धर्मप्रवचन संपल्यानंतर संसाराच्या अनित्यतेमुळे विरक्त होऊन प्रद्युम्न, निषध, शुक, सारण, शांबादि राजपुत्रांनी भगवानाजवळ मुनिदीक्षा घेतली. पूर्वी केलेल्या कर्माच्या भयाने व्याकूळ होऊन रुक्मिणीहि वासुदेवाला विनवू लागली, "महाराज, संसाराचा, विशेषेकरून यादवकुळाचा हा असा परिणाम आहे. तेव्हा मला अनुज्ञा द्या, मी प्रव्रज्या घेते." तेव्हा आसवांनी दोन्ही डोळे डबडबले असताना कृष्णाने कशीतरी अत्यंत दुःखाने रुक्मिणीला (आर्जिका होण्याची परवानगी दिली. दुसऱ्या (अनेक) उत्तमोत्तम राजकन्यासह तिने आर्जिकाधर्म स्वीकारला. प्रभु अरिष्टनेमींना वंदन करून अत्यंत दुःखीकष्टी झालेले यादव द्वारकेमध्ये आले. रुक्मिणीच्या वियोगाने वासुदेवहि वैभवविहीन झाल्याप्रमाणे स्वतःला मानू लागला. भगवान् सर्वज्ञदेवहि भव्यजनांना संबोधित करण्याकरिता दुसरीकडे निघून गेले.

८) वसुदेवाच्या पुत्राने (कृष्णाने) दुसऱ्या वेळीहि नगरीमध्ये अशी घोषणा करविली, "हे यादवानो, सुखी जीवनाची संवय झालेल्या हे नगरवासियानो, द्वीपायनापासून मोठेच भय उत्पन्न झालें आहे. तेव्हा प्रामुख्याने धर्मा(चरणां)त तत्पर व्हा. शक्त्यानुसार प्राणि वध करणें, खोटें बोलणें, दुसऱ्याच्या धनाचा अपहार करणें, परस्त्रीशीं (वैषयिक) संबंध ठेवणें आणि प्रमाणाबाहेर संपत्तीचा साठा करणें यापासून दूर रहा. एक, दोन, तीन, चार, पांच दिवस उपवासादि आचांम्ल तपाचरण करा. दक्षतेने देव पूजन, गुरुपास्तीमध्ये तत्पर रहा." त्यानींहि "होय" म्हणून हरीचा आदेश (शिरसावद्य) मानला.

९) तो दुष्टमनाचा द्वीपायनहि अत्यंत उग्र असें बालतप आचरून द्वारवतीचा नाश करण्याचें निदान बांधून मरण पावला आणि अग्निकुमार देवामध्ये भवनवासी देव झाला. त्याने यादवाविषयींच्या वैराचें स्मरण केलें. द्वारवतीचा नाश करण्याच्या हेतूने तो आला पण (नाश) करू शकत नाही. कारण सर्वच लोक तपाचरणांत रत झाल्यामुळे, देवास वंदन

करण्यांत व पूजा करण्यांत मग्न असल्यामुळे आणि (पंचपरमेष्ठी) मंत्र जपण्यामध्ये गढून गेल्यामुळे त्यांच्यावर प्रभाव गाजविणें त्याला शक्य झाले नाही. अशातऱ्हेने द्वीपयानहि उणें शोधित तेथे दडून राहिला असताना बारा वर्षे निघून गेलीं. तेव्हा लोक विचार करू लागले, "अहो द्वीपायन (आतां) निर्जिव, निष्प्रभ होऊन त्याच्या तपांत बल राहिलेलें नाही." पुनः द्वारवतीतील जनता निर्भय होऊन क्रीडा करू लागली आणि मदिरापानाने उन्मत्त होऊन सुखोपभोगांत रत झाली. तेव्हा तो दुष्ट अग्निकुमार देव संधि साधून त्यांचा नाश करू लागला. पुष्कळ प्रकारचे उत्पात घडू लागले. तेव्हा तो अग्निकुमार प्रलयकाळाप्रमाणे आपल्या विद्येने वावटळ निर्माण करून (त्यायोगे) लाकडें, गवत, पानांचा ढीग करीत आणि मोठा आरडाओरडा करीत (सैरावैरा) धावत असलेल्या लोकांना नगरीच्या आंत फेकू लागला. मोठ्या भयानक जाळाने पेट घेतली. पुनः पुन्हा तो दुष्ट देव बागांतून झाडें, काटक्या, वेली, रोपटी, गवतादि त्यांत फेकू लागला. त्या भयंकर धुरकट आगीने घरांघरांतून जाणें शक्य होत नसे. द्वीपायनाने पेटवलेल्या अग्नीने असहाय्य नगरी सर्व बाजूनी पेट घेऊ लागली. विविध प्रकारच्या मणि, रत्न आणि सुवर्णाने शोभिवंत झालेले प्रासाद मोडून धाडकन् पृथ्वी-तलावर कोसळत असत. अग्नीमध्ये जळत असतांना मेंढचा, हत्ती, बैल, घोडी, खर, उंटादि जनावरे आणि पक्षी समूहांचा मोठा करुण आवाज होत होता. आपल्या बाहूंनी प्रेयसीनी आलिंगन दिल्या स्थितीत यादवजन जळत होते. त्यांच्या बायका विलाप करीत महाभयंकर हाहाकार करीत होत्या.

१०) त्यावेळीं द्वारावती जळत असलेली पाहून आक्रोश करीत बलदेव आणि वासुदेव पित्याच्या प्रासादांत गेले. चटकन् त्यांनी रोहिणी, देवकी आणि पित्यास रथामध्ये बसविले आणि अग्नीने जळत असल्यामुळे जुंपलेले घोडे आणि बैल तो रथ ओढू शकेनात, तेव्हा ते (स्वतः) ओढत नेऊं लागले. त्याचवेळीं "हे महाराज श्रीकृष्ण, हे राम, हे बाळ, हे वत्स, हे प्रभु," अशा तऱ्हेचे करुण शब्द सर्व घरांतून (ऐकूं) येऊ लागले. तेव्हा ज्यावेळीं बलदेव-कृष्णांनी दोन्हीहि रथ जलदीने नगरवेशीपाशी नेले त्यावेळीं आडन्यामुळे त्यांना अडथळा झाला. तेव्हा ज्यावेळी बलदेवाने तो आडणा

लाथेने चूर्ण केला, त्यावेळीं तो दरवाजा ज्वाळेमळे जळूं लागला. इतक्या अवधीमध्ये द्वीपायन बोलू लागला, " अहो, मी असे पूर्वीच सांगितले होते. तुम्हां दोघांशिवाय दुसऱ्या कोणाचीहि सुटका होणार नाही, अशी मी प्रतिज्ञा केली आहे. " त्यावेळीं कृष्णाने लाथेच्या प्रहाराने एक दार जमिनीवर पाडले आणि बळरामाने अग्नीने पेट घेतली असतानां देखील दुसरें पाडलें. त्यावेळी वसुदेव, रोहिणी आणि देवकी म्हणाली, " बाळानो, तुम्ही जिवंत असल्यावर यादवकुळाची पुनः उन्नति होईल, म्हणून लौकर लौकर तुम्ही निघून जा. " त्यावेळी मातापित्यांच्या सांगण्याप्रमाणे विलाप करीत ते यादवपुंगव निघून गेले. (नगरा) बाहेरील उध्वस्त बागेंत उभे राहून आणि वळून ते ती सुंदर (द्वारवती) नगरी जळत असलेली पाहू लागले द्वीपयानानेहि दैवी शक्त ने सगळचा वेशी झाकून ती नगरी संपूर्णपणे भस्मसात केली.

११) त्यावेळीं रामाचा कुब्जवारक नांवाचा पुत्र बाल राजकुमार असून चरमदेहधारी (मोक्ष मिळण्यापूर्वी शेवटचा जन्म) होता. तो आपल्या प्रासादाच्या शिखरावर चढून म्हणू लागला, " हे जवळपास असणाऱ्या देवानो. (श. देवगणानो), ऐका- मी जिनेंद्र (भगवान) अरिष्टनेमि प्रभूंचा शिष्य असून ममत्वविरहित, संयमी, आणि सर्व प्राणिमात्राविषयीं करुणाभाव असलेला असा आहे. जर का भगवंतांचें " तूं चरमदेही असून निर्वाणाला जाशील ", हें वचन खरें असेल तर हें असें कसें होईल ?" असें म्हणतांच जृंभकदेव (त्या ठिकाणीं) अवतीर्ण झाले. त्यांनी जळत असलेल्या राजवाड्यांतून त्याला वर उचललें आणि पल्हव देशांत जिनभगवानाजवळ नेलें.

१२. त्यावेळी कृष्णाच्या सोळा हजार राण्यांनी सम्यक् भावनेने अनशन स्वीकारलें. त्याचप्रमाणे सर्वच यादवस्त्रियांनी अग्नीच्या भयाने आणि धर्मामध्ये रत झाल्यामळे अन्नाचा त्याग केला. अशारीतीने द्वीपायनाने साठ ते सत्तर कोटी घराणीं जाळून टाकलीं. अशाप्रकारे खरोखर सहा महिने ती द्वारवती जळत होती. पुनः पश्चिम समुद्रामध्ये ती (नगरी) बुडून गेली. दुसरे बलदेव आणि वासुदेव हे दोघेहि तीव्र दुःखाने विव्हलचित्त

होऊन जळत असलेल्या द्वारवती नगरीकडे पहात अश्रूने उबडबलेल्या डोळ्यांनी एकमेकाकाकडे पाहू लागले, आणि विचार करू लागले, " हाय! काय हे ससाराचें क्षणभंगुरत्व ! काय ही या जीवलोकाची अनित्यता ! काय ही नशिबाच्या परिणामाची भीषणता ! आणि तसेच —

१) लाटांनी कुलपर्वत छिन्नभिन्न करून टाकणारा, (वेगाने) वहात असलेला समुद्रहि थोपविता येईल, पण खरोखर पूर्व जन्मामध्ये स्वतःच्या कर्माने निर्माण केलेल्या नशिबाचा परिणाम चुकवता येत नाही.

२) विधिवशात् अशी कांही भयंकर घटना जगामध्ये घडते की जी सांगता येत नाही, सहन करता येत नाही, किंवा झांकता येत नाही.

३) येथे पृथ्वीमंडळामध्ये कोणालाहि बुद्धि (चातुर्या) ने, पौरुषाने, मंत्रतंत्रानें किंवा देवांच्या समुदायाकडूनहि नशीबाचा परिणाम टाळता येत नाही."

१३) त्यावेळीं कृष्ण म्हणू लागला, " शोकाकूल, सर्व बांधव, नातेवाईक, स्त्रिया हरवून बसलेले आणि हरणासारखे भयविव्हल डोळे असलेले आम्ही कोठे जावयाचे?" राम म्हणाला, "सर्व प्रकारच्या पराक्रमांनी संपन्न असलेले पांडु राजाचे पुत्र आमचे सदाचेच नातेवाईक आहेत. दक्षिण समुद्रावर वसलेल्या त्यांच्या मथुरा नगरींत जाऊ या. " कृष्णाने सांगितलें, " द्रौपदीला आणण्याच्या वेळी ती महा गगानदी ओलांडत असताना ते पुढे गेले आणि मला त्यांनी रथ पाठविला नाही. म्हणून क्रोधाने त्यांचें सर्वस्व हरण करून मी त्यांना हाकून दिलें. मग त्यांच्या नगरींत आतां आम्हांला कसे जाता येईल? " बलदेव म्हणाला, " ते थोर पुरुष आमच्याच कुळात जन्मले असून आमचे जवळचे नातेवाईक आहेत. आमची (मानहानी) करण्याच्या दृष्टीने ते (आमच्याकडे) पहाणार नाहीत क्षुद्र मनुष्य देखील घराकडे आलेल्या (पाहुण्या) शीं निष्ठुरपणे वागत नाहीत. " तेव्हा कृष्णाने " बरे आहे " असे म्हणून (त्याचें म्हणणें) मान्य केलें. शरीरावरील तेज झांकीत ते पायानीच पूर्व दिशेकडे जावयाचे ठरवून जाऊ लागले. सुराष्ट्र

देश ओलांडून द्वारवती आणि नातेवाईकाकरिता शोक करीत ते हस्तिकल्प नगराच्या सीमेपाशी आले. कृष्णाने बलदेवास सांगितलें तें असें "तहान--भूकेने मी व्याकुळ झालों आहे." तेव्हा बलदेव म्हणाला, " तुझ्यासाठी अन्नपाणी आणण्याकरितां हा मी ताबडतोब निघतों आहे, तूंहि याठिकाणी दक्षतेने रहावेस. मी गेलों असताना या नगरामध्यें जर संकट ओढवलें तर (मात्र माझी) मोठी आरोळी ऐकून तूं (मदतीला धावून) यावेस." असें म्हणून मनामध्ये वासुदेवाचा विचार करीत बलदेव निघाला आणि हस्तिकल्प नगरामध्ये आला. त्याठिकाणी धृतराष्ट्रपुत्र ऋक्षदंत नांवाचा राजा रहात होता. (छातीवरील) श्रीवत्स (चिन्ह) आपल्या वस्त्राने झांकून बलदेव (नगरांमध्ये) आला. त्याठिकाणीं अशी बातमी पसरली होती की, उत्पात--अग्नीने बलदेव, केशव आणि त्यांच्या नातेवाईकासह सर्व द्वारवती नगरी जळून गेली आहे. त्यावेळी आकर्षक शरीर आणि सौंदर्यशाली बलदेवास पाहून अत्यंत चकित होऊन लोक म्हणू लागले, " काय ही उंची ! काय ही लावण्यसंपन्नता ! काय ही मृगांकासारखी तेजाची सौम्यता !" अशा तऱ्हेने गुणगौरव होत असताना बलदेव मिठाईच्या बाजारांत गेला. मुद्रिका देऊन त्याने उत्तम अन्न आणि हातातील कडे देऊन त्याने मदिरा घेतली. नंतर तो परत निघाला. तो नगरवेशीपाशीं पोहोचला. आणि इकडे द्वाररक्षकांनी राजाला निवेदन केलें की, " कोणी तरी बलवेवासारखा मनुष्य चोराप्रमाणे दुसऱ्याच्या संपत्तीविषयीं उत्सुक असून कडे आणि अंगठी देऊन अन्न व दारू घेऊन निघाला आहे." त्यावेळी ऋक्षदंत राजाने साशंक होऊन ताबडतोब आपलें सैन्य पाठविलें आणि रामाशीं युद्ध करण्यास सुरवात केली. रामाने मोठ्याने ओरडून श्रीकृष्णास युद्धाचा इषारा केला. अन्न व दारू बाजूला ठेऊन आणि जवळ असलेल्या हत्तीवर आरूढ होऊन तो ऋक्षदंताच्या सैन्याचा धुव्वा उडवू लागला. त्याचवेळीं जनार्दनहि (तेथे) ताबडतोब आला. वेशीचे दरवाजे पाडून आणि मोठी तुळी घेऊन ऋक्षदंताच्या सैन्याचा नाश करून त्याने ऋक्षदंतास जिंकलें. त्यांनी म्हटलें, " अरे दुष्टा, आमच्याबाहूंतील शक्तीहि नष्ट झाली (असें तुला वाटते) का? तेव्हा (जा आणि) शांतपणे आपल्या राज्याचा उपभोग घे. आम्ही हें कार्य सोडून दिलें आहे," असें म्हणून ते बलराईनी

सुशोभित झालेल्या बागेंत गेले. त्याठिकाणीं डोळ्यांतून अश्रू खाली गाळत ते (दोघेहि) 'जिनेश्वरांना नमस्कार असो' असें म्हणून त्या अन्नपाण्याचा आस्वाद घेऊ लागले. त्यांनी विचार केला, "हाय! पूर्वी तशा तऱ्हेने जेवण करून आतां अशा तऱ्हेने जेवण करण्याची पाळी आली. पण भूक आणि तहान आवरणें कठीण आहे, किंवा आतां (श. येथे) विशाद मानून काय फायदा? कारण भगवंतांनीच जगांतील सर्वच वस्तूंच्या क्षणभंगुरत्वाचें वर्णन केलें आहे." त्यावेळीं थोडेसे जेवण करून आणि आचमन करून ते दक्षिण दिशेकडे जाऊ लागले. ते कौशांबी नांवाच्या वनांत पोहोचले. त्यावेळीं दारू प्याल्याने, खारट जेवणामळे, कडक उन्हामुळे, अत्यंत श्रमामुळे, तीव्र दुःखावेशामुळे, घामामुळे आणि पुण्यनाशामुळे, वासुदेव तहानेने फार व्याकूळ झाला. त्याने म्हटलें, "भावावर लोभ असणाऱ्या बंधू, तहानेने माझें तोंड सुकलें आहे, थंडवनांत जावयासहि माझ्यात त्राण नाही (श. मी समर्थ नाही)." तेव्हा बलदेव म्हणाला, "माझ्या प्राणाहुनहि प्रिय असलेल्या (भाऊ), तूं या झाडाच्या सांवलींत विश्रांति घेत रहा. तोपर्यंत मी तुझ्याकरिता पाणी आणतों." त्यावेळीं रेशमी वस्त्र अंगावर घेऊन (श. वस्त्राने स्वतःला झाकून) जनार्दन पाय गुडघ्यावर ठेऊन झोपू लागला. बलदेवाने सांगितलें, "हे हृषित्य, तूं दक्षतेने रहावेस." त्याने वनदेवतांना म्हटलें, "हा माझा भाऊ सर्व लोकांना विशेषतः माझ्या दुःखी हृदयाला आवडता आहे. तेव्हा तुमच्या आश्रयास आलेल्या याचें तुम्ही रक्षण करावें" असें म्हणून बलदेव पाणी आणण्याकरिता गेला.

१४. इतक्या अवधींत शिकाऱ्याचा वेष धारण केलेला, हातांत धनुष्य घेतलेला, लांब लोंबत असलेली दाढी असलेला, वाघाचें कातडें अंगावर घेतलेला जराकुमार हरणाची शिकार करण्याकरिता त्या ठिकाणीं आला. त्याने आपलें उत्तम धनुष्य सज्ज करून त्यावर तीक्ष्ण बाण दूरपर्यंत ओढून "तेथें तरुण हरण उभे आहे" असा विचार करून जनार्दनास त्याच्या पायाच्या तळव्यांतील मर्मस्थानीं विद्ध केलें. चटकन् उठून (कृष्ण) असें म्हणू लागला, "अरे अपराधाशिवाय कोणी बरे अशातऱ्हेने पायाच्या तळव्यांत (बाण मारून) मला विद्ध केलें? ज्याचें कूळ मला माहीत नाही अशा कोणाहि पुरुषास मी पूर्वी मारलें नाही.

तेव्हा झटकन् तुझ्या कुळाचें नांव सांग " त्यावेळीं (बांबूच्या) झुडपा-पाठीमागे उभ्या असलेल्या जराकुमाराने विचार केला, " हा हरण नाही (तर) कोणीतरी थोर पुरुष दिसतो, आणि माझें कूळ विचारीत आहे. तेव्हा मी त्याला माझें कूळ सांगतों. " त्यावेळीं जराकुमाराने सांगितलें, " अरे, मी हरिवंशामध्ये जन्मलेला वसुदेवाच्या जरारमणीचा पुत्र पृथ्वीमंडळामधील एकुलत्या रणवीर हरीचा जराकुमार नांवाचा वडील भाऊ आहे. भगवान् अरिष्टनेमि जिनेंद्राकडून " जराकुमारापासून जनार्दनाचा मृत्यु होणार " हें वचन ऐकून बंधुवर्गाचा त्याग करून रानावनांतून हिंडतों आहे आणि (अज्ञातपणे) बारा वर्षें झालीं. तेव्हा तूंहि सांग, कोण तूं ?" तेव्हा कृष्ण म्हणाला, " ये, माझ्या प्रिय बंधो, ये, तुझा आणि बलदेवाचा तो मी धाकटा भाऊ आहे. तूं या ठिकाणीं माझ्या प्राणांचे रक्षण करण्याकरिता आला आहेस, पण तुझे कष्ट व्यर्थ ठरले. तेव्हा चटकन् ये. " त्यावेळीं जराकुमार जनार्दनाचा विचार करीत आला आणि कृष्णाला त्याने तशा स्थितींत पाहिलें. त्यावेळीं डबडबलेल्या डोळ्यांनी जराकुमार विलाप करीत म्हणू लागला, " हाय ! किती हत (भागी) मी ! दुष्ट असलेल्या माझा धिःकार असो. हे नरसिंहा, तूं येथे कसा आलास ? द्वीपायनाने द्वारवती जाळून टाकली का ? यादवांचा नाश झाला का ? कीं नाही ?" तेव्हा कृष्णाने जसें पाहिलें, ऐकलें तें सर्व त्यास सांगितलें. त्यावेळीं जराकुमार शोक करू लागला. " हाय ! मी पाप्याने कृष्णाचा (चांगलाच) पाहुणचार केला ! तेव्हा मी कोठे जाऊ ? कोठे गेलों असताना माझें चांगलें होईल ? भावास मारणाऱ्या माझ्याकडे पाहू तरी कोण शकेल ? जोवर हें जग अस्तित्वांत आहे आणि जोपर्यंत, हे केशवा, तुझें नांव टिकून राहील, तोपर्यंत माझी पाप्याची चांगलीच निंदा होणार. " तुझें मी हित करीन " म्हणून (तर) मी वनवास पत्करला. पण मी पाप्याने विपरीतच केलें. कोठे आहेत ते राजे ? कोठे आहेत त्यांच्या हजारो लावण्यवती अंगना ? आणि, हे जनार्दन, कोठे आहेत तुझे ते अनेक राजपुत्र ? " तेव्हा कृष्णाने सांगितलें, " हे राजन् जरानंदना, भगवान् अरिष्टनेमि जिनेंद्र प्रभूंनी सांगितलेंच आहे की, संसारांमध्ये प्रत्येक

प्राण्याच्या बाबतींत आपल्या कर्मदोषामुळे लक्षावधि संकटें सहजरीत्या कोसळत असतात. आणि पुन:

४) प्राण्याने पूर्वजन्मामध्ये जें कांही चांगलें–वाईट केलें असेल, मग तो दुसऱ्या द्वीपांत गेला असला तरीहि त्याच्या तेंच वांटचाला येतें.

५) ज्याने पूर्व जन्मांत आणि या जन्मांत जें चांगलें–वाईट कर्म केलें असेल, तें त्याला भोगावें लागतें; निमित्त मात्र दुसरा होतो. तेव्हा शोक करू नकोस, याबाबतींत तुझी निंदा होणार नाही.

कर्मच निंदनीय आहे, आणि जिनवाणी (कधी) खोटी होणार नाही. म्हणून माझ्या वक्षस्थळावर असलेलें हें कौस्तुभरत्न घेऊन तूं पांडवाजवळ जा. त्यांना तूं ही हकिगत सांगावीस व माझ्यावतीने असें बोलावेस, "द्रौपदीला परत आणण्याच्या वेळीं तुम्ही पुढे गेलांत आणि माझ्या शक्तीची परीक्षा घेण्याकरिता (माझ्याकडे) रथ पाठविला नाही, म्हणून (रागावून) तुमचें सर्वस्वच हिरावून मीं तुम्हांला हांकून दिलें, त्या माझ्या अपराधाची तुम्ही क्षमा करावी. खरोखर सज्जन माणसे विशेषत: ते नातेवाईक क्षमाशील असतात." तेव्हा सरळपणे जाण्यास जराकुमाराचें मन घेईना. तेव्हा पुन: कृष्ण म्हणाला, "हे महाभागा, ताबडतोब (इथून) नीघ. माझ्यावरील प्रेमांत मग्न असणाऱ्या बलदेवास तूं (चांगले) जाणतोसच. माझी तहान शमविण्याकरिता पाणी शोधण्यासाठी तो गेला आहे. परत आल्यानंतर मी मरण पावलेला पाहून तो तुला ठार करील. तेव्हा जा, याच पावलीं ताबडतोब निघून जा." तेव्हा (कृष्णाच्या) पायाच्या तळव्यांतून बाण काढून जराकुमार निघून गेला.

१५. वसुदेवहि वेदनेने व्याकूळ झाला असताना नवकार मंत्राचा जप करूं लागला. "अत्युत्तम पूजेस पात्र असणाऱ्या अरहंतांना वंदन असो, (अनंत) सुखाने संपन्न असणाऱ्या सिद्धांना वंदन असो, पांच प्रकारचे आचार पाळत असलेल्या आचार्यांना वंदन असो, स्वाध्याय आणि ध्यानामध्ये रममाण झालेल्या उपाध्यायांना वंदन असो, आणि निर्वाणाकरिता झटणाऱ्या मुनींना

वंदन असो. सर्वसंग परित्याग करून महामुनि झालेल्या जिनेंद्र (भगवान्) अरिष्टनेमींना वंदन असो." त्यानंतर गवताची शय्या बनवून आपलें शरीर वस्त्राने झांकून आणि वीरासन घेऊन तो विचार करू लागला, "धन्य ते शांब, प्रद्युम्न, अनिरुद्ध, सारणादि राजकुमार, यादवजन आणि त्याचबरोबर रुक्मिणी वगैरे राण्या, की ज्यांनी सर्वसंग परित्याग करून भगवंताजवळ दीक्षा स्वीकारली आहे. याउलट दुःखी असा मी तपाचरण न करतां मरत आहे." आयुष्याच्या शेवटच्या घटकेला शुभ परिणाम विसरून "अहो ! अकारण वैर पत्करलेल्या द्वीपयानाने (द्वारवती) नगरीचा आणि यादव कुळाचा एकाच क्षणांत विध्वंस केला. तेव्हा खरोखर त्या महापाप्याला ठार केले पाहिजे." अशातऱ्हेने अशुभपरिणाम भावित एक हजार वर्षे जीवन जगून तो मरण पावला आणि तिसऱ्या (वालुकाप्रभा) नरकामध्ये गेला.

१६. बलदेवहि कमलपानाच्या द्रोणामध्ये पाणी घेऊन अपशकुन होत असतानाहि धावत कृष्णाजवळ आला. "हा झोपला आहे" अशा समजुतीने पाणी (खाली) ठेवून तो विचार करू लागला, "तोपर्यंत झोंपू देत हा माझा हृदयनंदन ! सुखाने उठल्यानंतर मी त्यास पाणी देईन" प्रेमाने मन भारल्यामुळे तो मेला आहे हें त्याला कळून आले नाही. तेव्हा थोडावेळ वाट पाहून जवळ जाऊन बलदेवाने काळचा माशा वर घोंगावत असलेल्या कृष्णाला पाहिलें. तें पाहून भयभीत झालेल्या हलीने तोंडावरील वस्त्र बाजूला केलें. "तेव्हा हा मेला" अशी (किंकाळी) फोडून मूर्च्छित होऊन तो धाडकन् जमिनीवर पडला. चेतना प्राप्त झाल्यावर त्याने अशी कांही मोठी सिंहगर्जना आरंभिली की जेणेकरून हिंस्र पशूंचे कळप आणि वन थरारू लागले. तो ओरडू लागला. "पृथ्वीमध्ये एकुलता एक रणवीर असलेल्या माझ्या हृत्प्रिय भावाला ज्या निर्दय दुष्टाने मारलें तो जर खरा थोर योद्धा असेल तर त्याने समोर यावें. झोपलेल्या स्थितींत, बेसावध असताना किंवा उद्विग्न दशेंत असलेल्या माणसाला कसे मारता येईल ? तेव्हा खरोखर तो अधम पुरुष आहे, सत्पुरुष नव्हे." अशा तऱ्हेने मोठ्याने ओरडत बलदेव वनांत चोहोंकडे हिंडला आणि पुनः

गोविंदाजवळ परत आला. परत येऊन मोठ्याने आक्रोश करू लागला, " हाय ! माझ्या बंधू, हाय ! जनार्दना, हाय ! रणवीरा, हाय! महारथी, हाय ! हरि (कुलभूषण) शशांका, तुझ्या सौंदर्याकरिता, धैर्याकरिता, वीर्याकरिता, रंगाकरिता कीं रूपाकरिता मी शोक करूं ? " माझा आवडता भाऊ बल आहे " असें तूं म्हणत असस, मग ही विपरीतता का ? कीं तूं उत्तरहि देत नाहीस ? तुझ्याशिवाय दुर्दैवी, एकाकी असा मी काय करू ? तेव्हा कोठे जाऊं ? कोठे थांबू ? कोणाला सांगू ? कोणाला विचारू ? कोणाला मी शरण जाऊ ? कोणाला मी शिव्या देऊ ? कोणावर रुसू ? (खरोखर) सर्वच जग मला संपलेले आहे. हे वनदेवतानो, तुमच्याजवळ (रक्षणाकरिता) सोपविलेल्या जनार्दनाकडे असें दुर्लक्ष करणें तुम्हांला शोभले का ? ये, जनार्दन, ये ! न ऐकल्यासारखे काय करतोस ? मी तुझा काय अपराध केला आहे ? हे भगवती (वन) देवतांनो, या आणि कृपा करून माझ्यावर रागावलेल्या या वसुदेवनंदनाची समजूत घाला. भाऊ, हा दिनकर अस्ताचलास जात आहे. तेव्हा ऊठ, संध्यापूजनाची वेळ झाली. थोर पुरुष सायंकाळीं झोपत नाहीत. " थोडा वेळ गेल्यानंतर तो (पुनः) म्हणूं लागला, " दाट काळोखी रात्र झाली. हिंस्र श्वापदें चोहोंकडे भटकत आहेत आणि भयानक हेल काढीत कोल्हीण हिंडत आहे. " अशातऱ्हेने विलाप करीत असताना रात्र संपून पहाट झाली. तो पुनः म्हणू लागला, " अरे भाऊ ! सूर्य उगवला, ऊठ. " तो उठेनासा झाला तेव्हा प्रेमाने मन मोहित होऊन बलदेव तें शव आपल्या खांद्यावर घेऊन पर्वत–वनांमध्ये भटकू लागला. आणि त्यावेळीं वर्षाऋतु सुरू झाला.

१७. इतक्या अवधीमध्ये तो सिद्धार्थ सारथी देव झालेला होता, त्याने अवधिज्ञानाने बलास पाहिलें आणि अत्यंत शोकविव्हल होऊन तो विचार करू लागला, " हाय ! प्रेमासक्त होऊन बलदेव (मृत) कृष्णास कसा वाहून नेत आहे ! तेव्हा भ्रातृवत्सल बलदेवास मी जागृत करतों. " त्यावेळीं देवाने (आपल्या दैवी शक्तीने) पर्वतावरून उत्तम रथ हांकीत असलेल्या पुरुषास निर्माण केलें. तो रथ पर्वतावरून अडखळत जात असताना मोडला नाही पण सपाट जमिनीवर (मात्र) त्याचे शेंकडो तुकडे झाले. तो (मनुष्य)

ते (तुकडे) जोडू लागला. (तें पाहून) बलदेव म्हणाला, "हे मूर्ख माणसा, जो हा रथ पर्वताच्या कडयावर मोडला नाही आणि सपाट रस्त्यावर मात्र चूर्ण झाला; (मग) तुकडे तुकडे झालेला हा (रथ) तूं कसा सांधू इच्छितोस?" देव म्हणाला, "जो हा कृष्ण अनेक शेकडो हजारो युद्धामध्ये लढत असतानाहि मारला गेला नाही, तो आतां युद्धाशिवायच मरण पावला आहे, जेव्हा तो जिवंत होईल तेव्हा हा रथ पण नवीन होईल." पुनः एक मनुष्य शिलाखडावर कमळें रोवू लागलेला (दिसला). बल म्हणला, "शिलाखंडावर रोवलेलीं कमळें कशी वाढतील?" देव म्हणाला, 'हा तुझा भाऊ जेव्हा जिवंत होईल त्यावेळीं कमळें पण वाढू लागतील" थोडे अंतर चालून गेल्यानंतर जळलेल्या खोडाप्रमाणे असलेल्या तिंदूक झाडास पाणी घालत असलेल्या मनुष्यास (पाहून) तो म्हणाला, "या जळलेल्या झाडास पाणी घातल्याने का पालवी फुटणार आहे?" देव म्हणाला, "तुझ्या खांद्यावर असलेलें प्रेत जिवंत होईल त्याचवेळीं (पालवी फुटेल)." मग थोडेसे अंतर चालून गेल्यावर (केवळ) हाडांचा सांपळा असलेल्या गायीस एक गवळी हिरवें गवत चारत आहे असें त्याने पाहिलें. बलदेवाने विचारलें, "केवळ हाडांचा सांपळा असलेली गाय या कोंवळचा गवताने पुनः कधी जिवंत होईल?" देव म्हणाला, "ज्यावेळीं हा तुझा भाऊ कृष्ण जिवंत होईल (त्यावेळीं)"

१८. त्यावेळी जागृत झालेल्या बलाने विचार केला, "पूर्वी अजय ठरलेला माझा भाऊ मेला आहे का? म्हणून कोणी तरी वनांत (अदृश्य) राहून मला असें संबोधित आहे?" तेव्हा देवाने सिद्धार्थाचें रूप धारण करून म्हटलें, 'हे भद्र पुरुषा, पूर्वभवामध्ये तुझा सारथी असलेला मीच तो सिद्धार्थ! (भगवान्) अरिष्टनेमिस्वामींच्या प्रसादाने मी देव झालों. तूं पूर्वी म्हणाला होतास की, "मी संकटामध्ये सांपडल्यानंतर तूं मला संबोधित करावेस." म्हणून तुला जागृत करण्याकरिता मी आलों आहे. तेव्हा शोक सोडून दे आणि धीर धर. कारण–

६) तुमच्यासारखी माणसे देखील जर तीव्र शोकाने विचलित होतात मग या जगामध्ये अनिंदनीय धैर्य कोठून स्थिर होणार?

पुनः मरण आपल्या कार्यांत अनिवारणीय आहे कारण,

७) आपल्या महा पराक्रमाने राजांना जिंकलेले बल आणि केशव नाश पावतात, बलशाली चक्रवर्ती नष्ट होतात, अतुल वीर्यधारक असलेल्या आणि जगाचें हित करणाऱ्या थोर जिनेंद्रांचा देखील हत दैवाकडून शेवट होतो. देव, दानव, विद्याधर, ग्रह, चंद्र, सूर्य हे (पण मृत्यूच्या तडाख्यातून) सुटले नाहीत. या त्रैलोक्यामध्ये दुष्ट कृतांतरूपी सिंहाच्या तावडीतून कोणीहि सुटला नाही.

आणि पुनः

८) स्वच्छंद विहारी आणि सर्वांचा शत्रू असलेल्या दुष्ट यमराजाचा प्रभाव नष्ट करणारा असा कोणीहि या जगतीतलावर सांपडत नाही

९) त्या ठिकाणीं सर्व शस्त्रें गळून पडतात आणि मंत्र–तंत्राचा परिणाम होत नाही. अदृश्यरूपाने प्रहार करणाऱ्या त्याच्यावर कोण पराक्रम गाजवणार ?

१९. तेव्हा तूं शांत हो. पुनः (जिनेंद्र) प्रभूंनी पूर्वीच "जरा–कुमाराकडून जनार्दनाचा मृत्यु होईल," असें सांगितलें, त्याप्रमाणेंच तें (मरण) घडलें." बलाने विचारलें, "पण जराकुमाराने केव्हा कृष्णाचा वध केला ?" तेव्हा देवाने जराकुमाराची, जराकुमारास पांडवाकडे पाठविलें, येथपर्यंत सर्व हकिगत सांगितली. त्यावेळीं प्रेमाने सिद्धार्थास आलिंगन देऊन बलाने म्हटलें, "अहो, मी आतां काय करावे ?" देव म्हणाला, "सर्वसंग परित्याग करून मुनिधर्म पाळ, (भगवान्) अरिष्टनेमिजिनेंद्रांचा हितोपदेश आठव." तेव्हा बल म्हणाला, "तूं जें सांगितलेस तें मी स्वेच्छेने मान्य करतों. भगवंतांच्या उपदेशाचें मला स्मरण झालें. पण हें हरीचें शव मी कोठे ठेवू ?" देवाने सांगितलें, "दोन नद्यांच्या मध्ये वाळवंटावर आपण अग्निसंस्कार करूं. तीर्थंकर, चक्रवर्ती, बलदेव आणि वासुदेवांची जशी पूजा केली जाते तशी आम्ही पूजा करूं." नंतर त्यांनी (दोन) नद्यांच्या संगमावरील वाळवंटावर हरीचें प्रेत ठेवलें.

त्यांनी फुलें, सुगंधित द्रव्यें, धूपादींनी पूजा केली आणि कलेवर जळून गेलें

२०. इतक्या अवधीत भगवान् अरिष्टनेमिप्रभूंनी बलदेवाची प्रव्रज्या घेण्याची वेळ जाणली आणि (त्याच्याकडे) विद्याधर मुनीस पाठविलें. त्याच्याजवळ रामाने योग्यतरहेने मुनिदीक्षा स्वीकारली. तुंगिका पर्वतशिखरावर तो उग्र तपाचरण करू लागला. पूर्व प्रेमाने सिद्धार्थहि त्यांचे रक्षण करीत तेथेच राहिला.

२१. दुसरा जराकुमार सुद्धा दक्षिण मथुरेस पोहोचला. त्याने पांडवांना पाहिलें. त्याने (त्यांना) कौस्तुभ रत्न दिलें. त्याने द्वारवतीच्या विनाशापासून आपण येथे पोहोंचेपर्यंतची सर्व हकिगत पांडवांना सांगितली. पांडवांनीहि मोठा शोक केला, वर्षभर उत्तरक्रिया केल्या आणि जराकुमारास राज्य देऊन ते भगवंताकडे निघाले. त्याचवेळीं भगवानांनी मुनींच्या संघासह (मति, श्रुत ,अवधि व मनःपर्यय या) चार ज्ञानांनी संपन्न असलेला धर्मघोष नांवाचा मुनि पांडवांच्या प्रव्रज्येकरिता पाठविला. पांडवांनी मुनिदीक्षा घेतली आणि ते भगवंताकडे निघाले. दोन दिवस, तीन दिवस, चार दिवस, पांच दिवस, पंधरा दिवस, महिना, सहा महिने, इत्यादि उपवास करीत, बारा योजनावर भगवानांचे (समवशरण) आहे इतक्या अंतरावर पोहोचले. त्यांनी विचार केला, "उद्या आम्ही अरिष्ठनेमि प्रभूंचें दर्शन घेऊं." त्याच ठिकाणीं त्यांनी रात्र काढली. रात्र संपून सकाळ झाल्यावर लोकांच्या बोलण्यावरून "भगवान् ऊर्जयत् पर्वतावर निर्वाणाला गेले," असें त्यांनी ऐकलें. त्यावेळीं त्यांनी अत्यंत शोक केला आणि पौंडरीक पर्वतावर पादोपगमन सलेखना घेऊन ते मोक्षाला गेले. आगोदरच समुद्रविजयादि नऊ दशार्ह (राजे) आणि भगवंतांची माता (शिवादेवी), गजसुकुमाराने मुनिदीक्षा स्वीकारली त्यावेळीं प्रव्रज्या घेऊन स्वर्गास गेली. रुक्मिणी व इतर मोक्षास गेल्या. राजीमतीजवळ दीक्षा घेऊन द्रौपदी अच्युत स्वर्गास गेली. द्वारवती जळत असताना वसुदेव, रोहिणी व देवकी स्वर्गास गेलीं.

२२. आणि इकडे भगवान बलदेव मुनि तुंगिका पर्वतशिखरावर अत्यंत उग्र तपश्चर्या करीत राहू लागला. सातवेळां सात दिवस (उपवासाचे)

तप होतें. त्यामधील सातवेळां सातप्रकारची प्रतिमा अशी आहे–पहिल्या सात दिवसांत एकेक घास अन्न व एकेक घोट पाणी घ्यावयाचे. दुसऱ्या सप्तकांत दोन घास अन्न व दोन घोट पाणी घ्यावयाचे. तिसऱ्या सातवड्यांत तीन घास अन्न व तीन घोट पाणी घ्यावयाचे. अशा तऱ्हेने सातव्या सात दिवसांत सात घास अन्न व सात घोट पाणी घ्यावयाचे. ही सातवेळा सात दिवसांची भिक्षुप्रतिमा विधीपूर्वक ४९ रात्री व दिवस आणि १९६ भिक्षेने करावयाची असते. आतां आठवेळा आठ दिवसांची मुनिप्रतिमा. पहिल्या आठ दिवसांत एक घास अन्न व एक घोट पाणी घ्यावयाचे. दुसऱ्या आठ दिवसांत दोन घास अन्न व दोन घोट पाणी घ्यावयाचे. अशातऱ्हेने आठव्या आठ दिवसात आठ घास अन्न व आठ घोट पाणी अशा तऱ्हेने आठवेळा आठ दिवसांची मुनिप्रतिमा ६४ दिवस व रात्री आणि २८८ भिक्षेने करावयाची असते. अशारीतीने याच क्रमाने त्याने नऊ वेळा नऊ दिवसांची व दहावेळा दहा दिवसांची (भिक्षु प्रतिमा) आचरली. अशा रीतीने याच क्रमाने पंधरा दिवस व महिन्याचीहि (प्रतिमा) आचरली.

२३. गवतवाल्या, मोळीविक्या व लाकूडतोड्या लोकांनी दिलेला शुद्ध आहार तो स्वीकारीत असे. त्या मोळीविक्यांनी लोकांना व राजांना सांगितलें तें असें "कोणीतरी दिव्यरूपी महानुभाव पुरुष तपश्चर्या करीत वनांत रहातो आहे. तेव्हा ते राजे घाबरून विचार करूं लागले," (आमचें) राज्य (बळकावण्याची) इच्छा करणारा कोणीतरी तपश्चर्या करीत आहे किंवा आमच्या विरुद्ध विद्या साध्य करीत आहे. तेव्हां (तेथे) जाऊन त्याचा नाश करू या." तेव्हा चिलखत घालून, अनेक प्रकारचीं शस्त्रें घेऊन, निरनिराळ्या रथ-वहानामध्ये बसून तयारीनिशी ते राममुनीजवळ आले.

२४. आणि इकडे त्या सिद्धार्थदेवाने भगवान राममुनीच्या चरणाजवळ महाविक्राळ जबडे असलेले, भयंकर दिसणारे, विदारण करण्याकरिता तीक्ष्ण पंजे वर उचललेले आणि (मानेवरील) आयाळ हालवीत असलेले अनेक सिंह (दैवी विद्येच्या प्रभावाने) निर्माण केले. त्यावेळीं ते राजे दूरूनच भयभीत होऊन त्या महाप्रभावी बलदेवमुनीस वंदन करून जलदीने

परत फिरले, आणि आपआपल्या निवासास गेले. (अशारीतीने) बलदेव जगामध्ये नरसिंह म्हणून प्रसिद्ध झाला.

२५. अशातऱ्हेने तो उपशांतमग्न भगवान् तपाचरण करू लागला. त्याच्या स्वाध्याय, ध्यान व धर्मकथांनी आकृष्टचित्त झालेले वाघ, सिंह, चित्ते, ससे, शरभ, काळवीट, हरणादि पुष्कळ (प्राणी) उपशांत झाले. कोणी श्रावकांचीं व्रतें घेतलीं, कोणी चांगले बनले, कोणी उपवास स्वीकारला. दुसरे कांही मांसाहाराचा त्याग करून कायोत्सर्गध्यानामध्ये उभ्या असलेल्या किंवा बसलेल्या राममुनीजवळ राहून त्याची सेवा करू लागले. त्याठिकाणीं पूर्वजन्मामध्ये भगवान् राममुनीचा संबंधित असलेला एक हरिणयुवक जातिस्मरण होऊन संसारापासून अत्यंत विरक्त झाला. ज्या ज्या ठिकाणी भगवान् राममुनि भिक्षादिकरिता विहार करीत असे, तेथे तेथे तो त्याच्या पाठीमागून जाऊ लागला.

२६. एकदा बलदेव महिन्याचा उपवास सोडण्याकरिता भिक्षेसाठी एका शहरामध्ये प्रवेश करीत असताना, विहिरीच्या कांठावर उभी राहून विहिरींतील पाणी काढण्यात गुंतलेल्या एका युवतीच्या दृष्टीस पडला तेव्हा बलदेवाच्या अद्वितीय रूपाने मन विलचित होऊन त्याच्याविषयींच (विचार करण्यात) चित्त एकाग्र झाल्यामुळे तिने घागरीचा कांठ समजून आपल्या कांखेतून खालीं उतरविलेल्या मुलाच्या गळचाभोंवती (दोरीचा) फास बांधला. नंतर तिने त्यास खालीं सोडलें. तें बलदेवाने पाहिलें तेव्हा तो (अधिकच) विरक्त झाला आणि विचार करू लागला, "हाय! माझें शरीर पण जीवांना अनर्थकारक आहे." अनुकंपेने त्याने त्या बालकाची सुटका करविली. "तेव्हा आतां येथे असताना स्त्रियांच्या दृष्टीस न पडतां जर मला भिक्षा मिळाली तर घेईन नाहीतर नाही," असें व्रत घेऊन तेथून तो परतला आणि त्याच अरण्यांत गेला.

२७. एकेवेळीं उत्तम लाकडाकरिता रथकार त्या वनांत आले आणि झाडें तोडू लागले. ते भोजन तयार करण्यात गुंतल्यावेळीं बलदेव महिन्याच्या उपवासाचें पारणें करण्याकरिता भिक्षा मागण्यास (त्याठिकाणीं)

गेला. हरिण पण त्याच्या मागोमाग गेला. तेव्हा बलदेवास पाहून प्रमुख रथकार विचार करू लागला, " ओहो ! काय हा माझा भाग्योदय ! कारण (अशा) वाळवंटांतहि मला कल्पवृक्ष मिळाला. काय ही याची रूप, उपशम व तेजाची संपदा ! मुनि भिक्षेकरिता माझ्याकडे आल्यामुळे मी कृतकृत्य झालों, माझे मनोरथ सफल झाले. म्हणून यांस आहारदान देऊन मी माझ्या पापाचा नाश करतों. " असा विचार करून जोडलेले हात डोक्यावर ठेवून, गुडघे जमिनीवर टेकून त्याने मुनीस नमेस्तु केला आणि अन्नपाणी घेऊन तो (आहारदानाकरिता) उभा राहिला. मुनीने पण द्रव्य, क्षेत्र, काल व भाव शुद्ध जाणून त्याचा स्वीकार केला. रथाकाराला त्या (आहार) दानाचें फळ म्हणून स्वर्गांतील आयुष्याचा बंध पडला. अत्यंतिक मुनिभक्तीमुळे ज्याच्या नेत्रयुगुलांतून अश्रू गळत आहेत असा हरिण त्या रथाकाराडे व मुनीकडे पुनः पुन्हा प्रसन्न व मंद दृष्टी टाकीत विचार करू लागला. " ओहो, किती धन्य व कृतार्थ आहे हा रथाकार ! मनुष्यजन्म याला चांगला मिळाला आहे, त्यामुळेच याने या श्रेष्ठ मुनीस आहार दिला. पण दुर्भाग्य माझें म्हणून कर्मदोषामुळे मी तिर्यंच गतींत (म्ह. पशू होऊन) जन्मलों आहे. या महा तपस्व्यास आहार देण्यास मी समर्थ नाही. तेव्हा धिःकार असो माझ्या जन्माचा ! " त्याचवेळी सोसाटयाच्या वाऱ्याने हलल्यामुळे अर्धें कापलेलें झाड रथाकार, बलदेव व हरणावर पडलें. तिघांचेहि प्राण निघून गेले आणि ते ब्रह्मलोकांत पद्मोत्तर विमानांत देव होऊन जन्मले.

२८. शंभर वर्षे मुनिधर्माचें आचरण केल्यामुळे बलदेवास अत्युत्तम सौंदर्य, वैभव, सुखोपभोग व उत्कर्षाची प्राप्ती झाली. तेव्हा बलदेव (पूर्व) प्रेमामुळे अवधि ज्ञानाने कृष्णाला पाहू लागला. त्यावेळी तिसऱ्या नरका-मध्ये उत्पन्न होऊन आत्यंतिक दुःख भोगत असलेला तो त्यास दिसला. ताबडतोब अद्भुत शरीर धारण करून तो कृष्णाजवळ गेला. त्याठिकाणीं दिव्य रत्नांचा प्रकाश निर्माण करून त्याने जनार्दनास पाहिलें. बल म्हणाला, " अरे भ्रातृवत्सल कृष्णा, मी तुझ्याकरिता आतां काय करूं ? " कृष्णाने सांगितलें, " पूर्वकर्माच्या दोषामुळे निर्माण झालेलें दुःख मी भोगतों

आहे. याठिकाणीं कोणीहि तें निवारूं शकणार नाही." तेव्हा बलाने दोन्हीहि हातांनी कृष्णास वर काढलें व वर उचलून धरलें असताना उष्णतेने लोणी वितळावें त्याप्रमाणे तो (हातांतून गळून) पडला. तेव्हा कृष्ण म्हणाला, "सोड, सोड मला (त्यामुळे) मला अधिक त्रास होतो. तेव्हा भारत क्षेत्रांत जा. तेथे जाऊन गदा, तरवार, शंख आणि चक्र धारण केलेल्या पीतांबर नेसलेल्या व गरुडध्वज असलेल्या माझें आणि नांगर व मुसळ घेतलेल्या, निळें वस्त्र परिधान केलेल्या आणि ताल चिन्हांकित (ध्वज) असलेल्या तुझें रूप सर्व लोकांना दाखव" तेव्हा बलाने 'ठीक आहे" असे (म्हणून) संमति दिली. स्वर्गीय विमानांत बसून त्याठिकाणी येऊन त्याने दामोदर बलदेवाचें रूप दैवी शक्तीने निर्माण करून लोकांना, विशेषतः शत्रूंच्या पुढे दाखविलें. बलदेवाने सांगितलें तें असें "जेथे तीन व चार रस्ते मिळतात तेथे व चौकांत आमच्या मूर्ति स्थापा. आम्ही (जग) निर्माण करतों व त्याचा नाश करतों. स्वर्गातून येतों, पुनः जातों. नानाप्रकारच्या क्रीडा करतों. आम्ही द्वारवती वसवली, पुनः आम्हीच तिचा नाश केला आणि समुद्रात फेकली. तेव्हा आम्ही या ठिकाणीं (सर्व गोष्टीस) कारणीभूत आहों." तेव्हा लोकांनी गोंधळून "बरें" म्हणून (सर्व) मान्य केलें. आदेशिल्याप्रमाणे त्यांनी सर्व केलें. तेव्हा परंपरेने अशी गोष्ट प्रसिद्ध झाली. असें केल्यानंतर बलदेवहि स्वर्गांत गेला. तेथून च्युत होऊन कृष्णाचा जीव ज्यावेळीं बारावा अमम (नांवाचा) तीर्थंकर होईल त्यावेळीं तो मोक्षाला जाईल.

२९. अरण्यांत लाकडें व गवत विकणाऱ्या लोकापासून भिक्षा मिळविणें जितके कठीण आहे तितके नगरामध्ये श्रीमंत घरांतून मिळविणें कठिण नाही. म्हणून या बलदेवाने भिक्षा मिळविण्याकरिता जे परिषह सहन केले तसे (सर्वांनी) सहन करावेत.

□ □ □

२. मूलदेव

१. उज्जयिनी नांवाची नगरी होती. सर्व कलेमध्ये प्रविण, अनेक शास्त्रामध्ये तज्ञ, उदार हृदयी, कृतज्ञ, शरण आलेल्यास (अभय देण्यामध्ये) शूर, गुणचहाता, मधुरभाषी, दक्ष, आणि रूप, सौंदर्य व तारुण्याने परिपूर्ण असलेला, (पण) जुगार व्यसनामध्ये आसक्त असल्यामुळे पित्याकडून अवमानिलेला मूलदेव नांवाचा राजकुमार पाटलीपुत्रातून पृथ्वीपर्यटन करीत तेथे आला. त्याठिकाणीं (मंतरलेल्या) गोळीच्या सहाय्याने वेष पालटून वामनरूप धारण केलेला तो नवलाईच्या कहाण्यांनी, संगितादि कलांनी आणि अनेक प्रकारच्या कौतुकांनी, नगरवासियांना विस्मित करीत असे. (अशातऱ्हेने) तो ख्यातनाम झाला. तेथे (च) रूप, लावण्य आणि ज्ञानामुळे गर्वोन्मत्त झालेली देवदत्ता नावाची प्रमुख वेश्या (रहात) होती. स्वत: विषयीच्या गर्वामुळे कोणीहि सर्वसाधारण मनुष्य तिचें रंजन करू शकत नाही असें त्याने ऐकलें. तेव्हा कुतुहलाने तिला विचलित करण्याकरिता प्रात:काळी (तिच्या विलासभवना) जवळच बसून तो गोड आवाजाने, गळचात घुमणाऱ्या अनेकविध स्वराने आणि नानाप्रकारच्या शब्दसंयोगाने युक्त कर्णमधुर गीत गाऊं लागला. तें देवदत्तेने ऐकलें. ती विचार करू लागली, "अहाहा! काय पण अपूर्व आवाज! म्हणून हा कोणीतरी दिव्य (पुरुषच) असला पाहिजे, केवळ मनुष्य नव्हे!" तिने दासीकडून त्याचा शोध करविला. त्यांनी त्याचा शोध केला आणि मूलदेव त्यांना वामनरूपामध्ये दिसला. त्यांनी तो जसा आहे तसे (त्याचें वर्णन करून) तिला सांगितलें. तिने पाठीत पोक आलेल्या माधवी नांवाच्या दासीला त्यास बोलावण्याकरता पाठविलें. (जवळ) जाऊन विनयाने तिने त्यास म्हटलें, "हे महाभाग, आमच्या देवदत्ता स्वामिनीने (आपणास) विनविलें आहे, "आमच्या हवेलीस पायधूळ झाडून (श. घरीं येऊन)

अनुग्रह करा." त्याने चाणाक्षपणे म्हटलें, "वेश्याशीं संगत मला काय कामाची? प्रतिष्ठितांना वेश्यांचा संपर्क निषिद्ध मानला आहे. असें म्हटलें आहे.

१) अनेक कोटचावधि कामीपुरुषांनी कुस्करलेल्या, मदिरासक्त, मांसभक्षी, अत्यंत हलक्या मनाच्या, मधुर भाषण करणाऱ्या नि दुष्ट मनाच्या वेश्येकडे थोर पुरुष (कधी) जात नाहीत.

२) जळत्या ज्वालेप्रमाणे दुसऱ्याला जाळणारी, मदिरेप्रमाणे मन उन्मत करणारी, कटचारीप्रमाणे शरीर चिरणारी आणि शल्याप्रमाणे (बोचणारी) अशी वेश्या निंदनीय आहे.

२. म्हणून (तिच्याकडे) येण्याची माझी इच्छा नाही. तिनेहि नानाप्रकारे चतुर भाषणांनी त्याचें मन मोहविलें आणि अत्याग्रहाने त्याचा हात धरून त्यास (तिच्या) हवेलींत नेलें. जात असताना मंत्राचा प्रयोग करून कलेतील नैपुण्याने तिला ताठ करून त्याने पाठीत वाकलेल्या तिला सरळ केलें. विस्मयाने भारलेल्या मनाने तिने त्याला महालात आणलें. देवदत्तेने बुटक्या पण अतुलनीय सौंदर्यशाली असलेल्या त्याच्याकडे दृष्टिक्षेप केला. चकित होऊन तिने (त्याच्याकरिता) बैठक मांडविली. तो (त्यावर) बसला. त्यास विडा दिला. माधवीने आपला (सरळ झालेला) देह तिला दाखविला आणि (घडलेली) हकिगत सांगितली. ती अधिकच आश्चर्यचकित झाली आणि गोड व चतुर बोलांनी तिने त्याच्याशी संभाषण सुरू केलें. त्याने तिचें हृदय आकृष्ट केलें. असें सांगितलें आहे.

३) खरें म्हणजे. दुसऱ्यास आकर्षून घेण्यांत तत्पर असलेलें, विनोदाने मोहक झालेलें आणि सुंदर भाषेने नटलेलें विचक्षण लोकांचें बोलणेंहि जादूमय आहे. (मग) मंतरलेल्या मुळचा काय कामाच्या?

३. त्याचवेळी वीणावादन करणारा एक (कलाकार) तेथे आला. त्याने वीणा वाजवून देवदत्तेची करमणूक केली. ती (खूष होऊन) म्हणाली, " छान ! वीणावादका, सुंदर ! तुझें कलेंतील नैप्युण्य वाखाणनीय आहे. (श. तुझी कला उत्तम आहे.) " मूलदेव (खवचटपणे) म्हणाला, " ओ

हो ! काय पण उज्जयिनीतील माणसाची अत्यंतिक चतुराई ! चांगल्या-वाईटांतील फरक त्याला (चटकन्) कळतो ! " देवदत्तेनें विचारलें, " अहो, (सांगा ना पण), काय आहे याच्यात दोष? " त्याने निवेदन केलें, " वेळूच मूळी सदोष आहे, आणि तारेमध्ये (कांही) आडकलें आहे. " " कसं कळलं तुम्हांला?" तिने पृच्छा केली. " मी प्रत्यक्षच दाखवितों. " (त्याने म्हटलें.) (त्याच्याकडे) वीणा दिली गेली. त्याने वेळूतून खडा आणि तारेत गुंतलेला केस काढला. (तारा) जूळवून तो वाजवू लागला. सेवकजनासह त्याने देवदत्तेचें चित्त आकर्षित केलें. जवळच (गजशाळेंत) असलेली हत्तीण सदासर्वकाळ गर्जत असे. ती पण कानाची पाळें हलवीत डोलत (ऐकत) उभी होती. देवदत्ता व वीणावादक (दोघेहि) अतिशय चकित झालीं, आणि त्यांना वाटलें, " खरंच, वेषधारी विश्वकर्मा तर नव्हे ना हा? (श. ओ हो ! हा वेषधारी विश्वकर्मा होय.)" वीणावादकाचा सत्कार करून तिने त्याला निरोप दिला. जेवणाची वेळ झाली. देवदत्तेने म्हटलें, " अंगमर्दकाला बोलवा म्हणजे आम्ही दोघेहि स्नान करू." मूलदेव म्हणाला, " तूं म्हणशील (श. अनुमति दिली) तर मीच तेल लावाव म्हणतों (श. लावीन)." " काय, हे पण जाणता? " " मला चांगलंस ज्ञान नाही, पण माहितगाराच्या संगतींत राहिलों होतों. " चंपकतेल आणले गेलें. तो तेल लावू लागला. त्याने तिला स्वतःस विसरून जावयास लावलें. तिने विचार केला, " काय पण (त्यांचे) विशेष कौशल्य ! किती सुखकर (श. अपूर्व) आहे यांचा हस्तस्पर्श ! म्हणून, (मला वाटतं), हे कोणी तरी वेषधारी सिद्धपुरुषच असावेत. अशा (वामन) रूपी माणसाचा असा स्वाभाविक प्रकर्ष (मुळी) असणार (च) नाही. तेव्हां (खरं) रूप प्रकट करवितें. " त्याच्या चरणावर पडून ती म्हणाली, " हे महानुभाग, आपल्या अतुलनीय गुणांनीच आपण नरपुंगव आहात हें समजून आलं. आपण दुःखी-कष्टी जीवाविषयी करुणानिधी नि दाक्षिण्यप्रधान आहांत. म्हणून (म्हणते), आपलं (खरं) स्वरूप मला दाखवा. आपल्या दर्शनाकरिता माझं मन अत्यंत आतूर झालं आहे." पुनः पुन्हा आग्रह केल्यामुळे मूलदेवाने किंचित् स्मित करून रूप पालटणारी गुलिका बाहेर काढली. त्याचे मुळचे रूप प्रकट झालें. दिनराजाप्रमाणे तेजाने तळपणारा,

स्वरूपाने कामदेवाप्रमाणे सर्व लोकांना मोहून टाकणारा आणि ऐन तारुण्याने ज्याचें सौंदर्य देहयष्टीवर झळकते आहे (श. नवतारुण्य व लावण्यसंपन्न देहाचा) असा तो तिला दिसला. हर्षातिशयाने रोमांचित होऊन पुनरपि ती त्याच्या पायावर पडली आणि म्हणाली, " (माझ्यावर) आपला हा महानुयोगच म्हणायचा ! " स्वहस्ताने तिने त्यास तेल लावलें. दोघांनीहि स्नान आटोपलें व मोठ्या थाटाने भोजन उरकलें. त्यास रेशमी कपडे घालावयांस लावले आणि त्यांच्या विशेष प्रकारच्या गप्पागोष्टी सुरू झाल्या. ती म्हणाली, " आर्यपुत्र (श. भद्र), आपल्या शिवाय दुसऱ्या कोणाहि पुरुषाने माझ्या मनाला रंजविलें नाही. तेव्हा खरीच म्हणायची तर ही (उक्ती) !

४) कुणाला डोळ्यांनी पाहिलं जात नाही ? कोणाबरोबर संभाषण होत नाही ? पण मन-रंजन करणारा मनुष्य मिळणें दुर्मिळ आहे.

तेव्हा माझ्या विनवणीनुसार आपण येथें घरी सतत यावे." मूलदेव म्हणाला, " हे गुणप्रिये, आमच्यासारख्या परदेशी नि निर्धन पुरुषावर अनुराग करणं तुला शोभत नाही, आणि तो स्थीर रहाणार नाही. प्रायः सर्वांचाच लोभ कारणपरत्वे होत असतो. असें म्हटलें आहे-

५) फळें झडलेल्या झाडावरून पक्षी उडून जातात, अटलेल्या तलावाचा सारसपक्षी त्याग करतात, अलिवर कोमजलेल्या पुष्पिकेपासून दूर होतात, मृग जळलेल्या वनातून बाहेर जातात, वेश्या पैसे नसलेल्या पुरुषाला सोडून देतात आणि नोकर पदच्युत राजाला (एकाकी) टाकतात. काम साधण्यापुरतेच सर्वजन (दुसऱ्याशीं) संबंध ठेवतात (श रमतात); नाहीतर कोण कोणाला प्रिय आहे ? "

तिने म्हटलें, " सज्जनांच्या बाबतींत आपल्या देशातला मनुष्य काय किंवा परक्या मुलुखातला काय (हा भेद) विनाकारणच (नव्हे का) ? असें म्हटलें आहे-

६) सागरसुंदरी (श. सागरा) पासून वियोगित झालेला चंद्र शंकराच्या डोक्यावर बसतो. गुणी मनुष्य जेथे जातो तेथे डोक्यावर घेऊन स्तविला (जातो).

त्याचप्रमाणे संपत्ति देखील असार आहे, प्रज्ञजनांना त्याची (तितकी) किंमत नसते. पुनः गुणावरच (खरी) प्रीति अवलंबून असते. आणखी म्हणजे,

७) सत्पुरुषाच्या बोलण्याची किंमत हजार नाणी होते, त्याची प्रेमभरी दृष्टी लक्षानी मोजली जाते, तर त्याचा स्वभाव कोटी नाण्यांनी (हि) तोलता येणार नाही.

तेव्हा सर्वच दृष्टींनी माझी विनवणी मान्य करा. त्याने कबूल केलें. त्यांचे प्रेमभरी मीलन झालें.

४. एके दिवशीं नराधिपासमोर देवदत्ता नृत्य करू लागली. मूलदेव तबला वाजवू लागला. तिच्यावर महाराज खूष झाले. त्यांनी (तिला) वर दिला. तिने तो (त्यांच्याजवळच) राखून ठेवला. तो (मूलदेव) अतिशय जुगारप्रेमी होता. केवळ वस्त्र देखील रहात नसे. तिने गोड बोलून त्यास कळकळीने विनविलें, "प्राणप्रिया, हरणाविषयी आसक्त असणाऱ्या चंद्राप्रमाणे आपल्या सर्व गुणभांडारावरील डागच अशा जुगाराचें व्यसन कशाकरिता बरे लावून घेतलें आहे ? हें तर अनेक दोषांचे आगर आहे. खरोखर असें आहे --

८) घराण्याला डाग असलेल्या, खऱ्याचा खून पाडणाऱ्या (श. प्रतिस्पर्धी असलेल्या), मोठ्या शरमेचे व दुःखाचे आगर असलेल्या, धर्माला प्रतिबंध करणाऱ्या, संपत्तीचा विनाश करणाऱ्या, दान व सुखोपभोगांनी विरहित असलेल्या, पुत्र, पत्नी, पिता, माता यांना हिरावून घेणाऱ्या, जेणेकरून देव-गुरूला किंमत दिली जात नाही आणि कार्याकार्याचा जेथे (भेद मानला जात) नाही अशा शरीराला त्रस्त करणाऱ्या आणि दुर्गतीच्या मार्गावर सोडणाऱ्या त्या जुगारामध्ये नका रमू, जिवलगा !

म्हणून (म्हणते), हा (नाद) सर्वांशाने सोडून द्या." पण अत्यंतिक आसक्तीमुळे मूलदेवाला त्याचा त्याग करणें जमलें नाही

५. देवदत्तेवर अतिशय फिदा झालेला (गर्भ) श्रीमंत आणि दोस्तांची टोळी असलेला अचल नांवाचा व्यापाऱ्याचा मुलगा होता. जें मागेल तें तो देत असे. (भरजरी) कपडे आणि (मौल्यवान) दागिने तो प्रदान करीत असे. मूलदेवाविषयी द्वेष बाळगून तो त्याचें उणें शोधित होता. (योग्य) संधि मिळाल्याशिवाय त्याच्या भयाने मूलदेव तिच्या घरीं जात नसे. (एके दिवशीं) देवदत्तेला तिची आई म्हणाली, "मुली, मूलदेवाला सोडून दे. दारिद्र्याचा चांगुलपणा असलेल्या याच्याशीं आम्हांला कांही कर्तव्य नाही. तो थोर दाता अचल वरचेवर पुष्कळ धन पाठवतो आहे. म्हणून अत्यंत प्रीतीने त्याचाच स्वीकार कर. एका म्यानांत दोन तलवारी मावत नाहीत. लोणी नसलेल्या दगडाला कोणी चाटत नाही. तेव्हा या जुगाऱ्याला सोडून दे." तिने सांगितलें, "नाही ग आई, केवळ पैशावर माझा लोभ नाही, (त्यांच्या) गुणावरच मी भाळलें आहे." मातेने विचारलें, "कसले ग (एवढे) त्या जुगाऱ्याचे गुण आहेत?" ती म्हणाली, "आई, खरच, ते केवळ गुणमय आहेत. कारण–

९) धैर्यवान, दिलदार मनाचे, दाक्षिण्याचा महासागर असलेले ते कलाकुशल, गोड बोलणारे, कृतज्ञ, गुणप्रिय आणि मोठे विचक्षण आहेत.

म्हणून मी त्यांना सोडू (शकत) नाही." तेव्हा ती (माता) निरनिराळे दाखले देऊन तिला शिकवूं लागली, अलक्तक रस मागतांच ती वाळलेला देऊ लागली, उसाची कांडी मागितली असता तिने चिपाड पुढे ठेवलें, फुलें दे म्हटल्यावर तिने केवळ देठच (हातांत) दिला. (असे का? म्हणून) विचारतांच तिने स्पष्टिकरण केलें, "जसें हें तसाच तो तुझा प्रियकर. तरी पण तूं त्याला दूर करत नाहीस!" देवदत्तेने विचार केला, "वेडी आहे ही! म्हणूनच असले दाखले देते."

६. तेव्हा एकदा तिने मातेला म्हटलें "आई, अचलाकडे ऊस माग." तिने त्याला (ऊस पाठवावयास) सांगितलें. त्याने पण गाडी भरून पाठविले.

(ते पाहून) ती म्हणाली, "मी हत्तीण का आहे म्हणून अशातऱ्हेचे पाने, डहाळ्यासह इतके ऊस पाठविले?" तिने समजूत घातली, "मुली, खरं म्हणजे तो दिलदार आहे यामुळे त्याने असे पाठविले. दुसऱ्यालाहि तूं देशील असं वाटलं असावं त्याला!" दुसऱ्या दिवशी देवदत्तेने माधवीला सांगितलें, "हले, मूलदेवांना (जाऊन) सांग, मला ऊस आवडतात, तेव्हा पाठवून द्या." तिनेहि जाऊन सांगितलें. त्यानेहि दोन ऊस घेतले. ते सोलून दोन दोन बोटाच्या गंडेऱ्या केल्या, (वेलदोडादि) चार सुवासिक द्रव्यांची पूड त्यावर शिंपडली, कापराचा थोडा वास लावला आणि (दोन्हीं बाजूंचीं) टोकें किंचित् विभागली. नवीन ताटें घेतलीं, त्यांत त्या गंडेऱ्या घातल्या, नि अच्छादन घालून पाठविल्या. परत येऊन माधवीने त्या (तिच्या पुढे) ठेवल्या. तिने पण मातेला दाखविल्या आणि ती म्हणाली, "पहा, आई, (पुरुषां) पुरुषां-मधील अंतर! म्हणून मी या (त्यांच्या) गुणावर मोहित झालें आहे." "याच्यावर अत्यंत अनुरक्त झाली आहे ही!" माता विचार करूं लागली. "स्वतःहून कांही ही याला सोडणार नाही. तेव्हा असा कांही बेत योजते की हा हिचा (दिलवर) दुसऱ्या देशाला निघून जाईल. (तसें झालें) म्हणजे (सगळं) ठीक होईल." असा विचार करून तिने अचलाला सांगितलें, "हिच्यासमोर तुम्ही गावाला जाणार आहांत असें खोटेच सांगा. नंतर मूलदेव आल्यावर पुष्कळ माणसे घेऊन या आणि त्याचा अपमान करा, म्हणजे अवमानित होऊन तो देशत्याग करेल. तेव्हा तयारीत रहा, मी तुम्हाला बातमी कळवतें." त्याने संमति दिली. दुसऱ्या दिवशीं त्याने तसेंच सांगितल्याप्रमाणे केलें. खोटेच गांवाला जाण्याच्या मिषाने तो निघाला. (तो गेल्यानंतर देवदत्तेच्या संकेतानुसार) मूलदेवाने (तिच्या रंगमहालांत) प्रवेश केला. तिच्या आईने अचलाला कळविलें, तो (दोस्त साथिदारांचें) मोठें टोळकें घेऊन आला. (घरांत) शिरत असतांना तो देवदत्तेच्या दृष्टीस पडला. तिने मूलदेवाला विनविलें, "प्रसंग हा असा आला आहे. याने पाठविलेले पैसे आईने स्वीकारले आहेत. तेव्हा तुम्ही मंचकाखालीं तो (जाई) पर्यंत थोडावेळ थांबा." तो पलंगाखालीं दडला (श. राहिला). अचलाने (त्यास) पाहिलें. अचल मंचकावर बसला आणि तिला म्हणाला, "स्नानाची तयारी कर." देवदत्तेने म्हटलें, "ठीक आहे, तेव्हा उठा, (दुसरें) वस्त्र नेसा,

म्हणजे तेल लावता येईल," अचलाने सांगितलें, "कपडे असतानाच तेल लावून या पलंगावर बसून मी अभ्यंगस्नान केलें, असें आज मीं स्वप्न पाहिलें म्हणून स्वप्न खरें कर." "इतक्या महागाच्या गादी, उशा, वगैरे खराब नाही का होणार ?" देवदत्ता म्हणाली. त्याने सांगितलें, "मी याच्यापेक्षा चांगले देईन." मातेने (हि) "असेंच होऊ देत." असा (भाव) व्यक्त केला. तेव्हा त्याठिकाणीं बसलेल्या स्थितींतच त्यास तेल लावलें, (सुवासिक उटी अंगाला) चोळली आणि स्नानाकरिता घेतलेल्या ऊन पाण्याने त्यास अंघोळ घातली. त्यामुळे खालीं असलेला मूलदेव भिजून गेला. (हातांत) शस्त्र घेतलेले (त्याचे) लोक आंत आले. तिच्या आईने अचलास खूण केली. त्याने मूलदेवाला केस धरून (बाहेर काढलें आणि) म्हटलें, "अरे आतां तुझ्या मदतीला (धाऊन येणारा) कोणी आहे का पहा." मूलदेवाने दोन्ही बाजूस नजर वळवली आणि हातांत तरवारी घेतलेल्या माणसांकडून आपण वेढले आहोत असें त्यास दिसून आलें. त्याने विचार केला, "माझी यांच्या (तावडीं) तून सुटका होणार नाही. वैराचा बदला मला घेतला पाहिजे, (पण) आतां माझ्याजवळ शस्त्र नाही. तेव्हा ही पराक्रम गाजविण्याची वेळ नव्हे." असा विचार करून तो म्हणाला, "जें तुला वाटेल तें कर." अचलाने विचार केला, याच्या वागण्यावरून हा कोणी श्रेष्ठ पुरुष दिसतो आहे. संसारांत थोर माणसावर सहजासहजी संकटें कोसळतात. असें म्हटलें आहे–

> १०) या जगांत कोण सदासर्वकाळ सुखी आहे ? कोणाची संपत्ति टिकून राहिली आहे नि प्रीति अटल आहे ? कोणाच्या हांतून चूक घडत नाही ? दैवाने कोणाचा नाश केला नाही ? हें सांग."

तो मूलदेवास म्हणाला, "अरे, अशा (कठिणा) वस्थेंत सांपडला असतांना (हि) मी तुला सोडतो आहे, दैववशात् कधीकाळीं संकटांत सांपडलों तर माझ्याहि बाबतींत असेंच कर."

७. त्यावेळीं उद्विग्नचित्त नि उदास झालेला मूलदेव शहरांतून निघाला. "पहा, कसे याने मला फसवलें !" असा विचार करीत त्याने

एका सरोवरांत स्नान आटोपलें आणि निश्चय केला. त्याने ठरविलें, "परदेशांत जावे आणि तेथे जाऊन त्याचा बदला घेण्याचा उपाय शोधावा." तो वेणातटाकडे निघाला खेड्यांतून व शहरांतून मार्ग आक्रमण करीत तो बारा योजने विस्तीर्ण असलेल्या अरण्यापाशीं आला. त्याठिकाणीं त्याने विचार केला, "जर (या रस्त्यावरून) जाणारा दुसरा कोणी (प्रवासी) भेटेल तर बोलत बोलत मजेने अरण्य ओलांडता येईल" तेव्हा थोड्याच वेळांत विशिष्ट प्रकारची देहयष्टी व चेहरा असलेला ढक्क ब्राह्मण शिदोरीचें गाठोडें घेऊन (तेथे) आला. त्याने विचारलें, "हे विप्र, तुला किती लांब जावयाचे जाहें?" त्याने सांगितलें, "या अरण्याच्या पुढे (च) वीरविधान नांवाचे ठिकाण आहे, तिकडे मी जात आहे. पण तूं कोठे निघाला आहेस?" दुसरा म्हणाला, "वेणातटाकडे." ब्राह्मण म्हणाला, "मग चल, (मिळूनच) जाऊं या." तेव्हा दोघेहि निघाले. वाटचाल करत असतांना त्यांना एक सरोवर दिसलें. ढक्क म्हणाला, "अरे, क्षणभर विसावा घेऊ या." त्यांनी पाण्यापाशीं जाऊन हातपाय धुतलें. मूलदेव (सरोवरा) काठीं असलेल्या झाडाच्या सांवलींत बसला (श. गेला). ढक्काने शिदोरीचें गाठोडें सोडलें आणि ताटांत भाकरी (श. सातूचा पदार्थ) घेतली. पाण्यांत ओलो करून तो खाऊं लागला. मूलदेवाने विचार केला, "अशीच ब्राह्मणाची जात फार खादाड असते. तेव्हा मला नंतर देईल." ब्राह्मणहि जेवण करून शिदोरी बांधून निघाला. मूलदेवहि "सायंकाळी तो खचित मला देईल," असा विचार करीत (त्याच्या) बरोबर निघाला. तेथेंहि तसेच तो जेवला पण त्यास त्याने (कांही) दिलें नाही. "उद्याला देईल," या आशेने तो निघाला. जात असतांना रात्र झाली. तेव्हा रस्त्यातून बाजूला येऊन ते वडाच्या झाडाखालीं झोपले. सकाळीं ते पुनः चालूं लागले. दुपारी तशाच रीतीने ते (विश्रांतिकरिता) थांबले, ढक्क (पूर्वीप्रमाणें) तसेच जेंवला (पण) त्याने त्यास (कांही) दिलें नाही. तेव्हा तिसऱ्या दिवशी मूलदेवाने विचार केला, "अरण्य जवळ जवळ पार झालें तेव्हा (निदान) आज निश्चितपणे हा मला (खायला) देईल." पण तरीहि त्याने (त्यास कांही) दिलें नाही. त्यांनी अरण्य

ओलांडलें. दोघांचेंहि भिन्नभिन्न रस्ते फुटले. त्यावेळीं ब्राह्मण म्हणाला, "अरे हा तुझा मार्ग आणि हा माझा. तेव्हां या (रस्त्या) ने तूं जा" मूलदेव म्हणाला, "हे द्विजा, तुझ्या सहाय्याने मी आलों तेव्हा, माझें नांव मूलदेव, जर केव्हांतरी माझें मनोरथ पूर्ण झाले तर तूं बणातटीं यावेस. तुझें नांव काय?" ढक्काने सांगितलें, "सद्धड पण लोकांनी माझें स्वभावानुसार निर्घृणशर्मा (दयारहित) नांव ठेवलें आहे." नंतर ब्राह्मण आपल्या गांवी निघाला आणि मूलदेवहि बेणातटाकडे (जाऊ लागला.)

८. रस्त्यावरच एक वसाहत दिसली. त्याठिकाणीं तो भिक्षेकरिता गेला. साऱ्या गांवभर हिंडला. त्याला कुम्मासाशिवाय दुसरें कांही मिळाले नाही. तो तळ्याकडे गेला. त्याचवेळीं तपश्चर्येने ज्याचें शरीर शुष्क झालें आहे असा थोर महान् तेजस्वी मुनि महिन्याच्या उपवासाचें पारणें करण्याकरिता त्या (वसाहती) मध्ये जात असतांना त्याला दिसला. त्याला पाहून हर्षातिशयाने रोमांचित होऊन मूलदेवाने विचार केला. "अहाहा! किती भाग्यशाली नि कृतार्थ आहे मी! म्हणून यावेळी हे महातपस्वी माझ्या दृष्टीला पडले आहेत. तेव्हा निश्चितपणे माझें भाग्य उदयाला येणार. आणि तसेंच

११) वाळवंटाच्या ठिकाणीं कल्पवृक्ष दिसावा, दरिद्री माणसाच्या घरीं सुवर्णवृष्टि व्हावी, चांडाळाच्या घरामध्ये गजराज असावा, त्याप्रमाणे हे महात्मे मुनि येथे (आले) आहेत.

आणखीन,

१२, १३) (सम्यक्) दर्शन-ज्ञानाने विशुद्ध, पंचमहाव्रतामध्ये दक्ष, धैर्यशाली, (उत्तम) क्षमा, मृदुभाव, सरळवृत्तीने परिपूर्ण, निर्वाण ध्येय (डोळ्यासमोर) असलेले, स्वाध्याय, ध्यान, तप आणि वीर्य यामध्ये मग्न असणारे, विशुद्ध लेश्याधारी, पांच-समिती पाळणारे, तीन गुप्ती धारण केलेले, अकिंचन, गृहस्थांचा संग सोडलेले,

असे हे मुनि (आहारदानास खरोखर) सुपात्र आहेत. म्हणून,

१४) अशा सुपात्र (म्ह. उत्तममुनि) रूपी उत्तम शेतामध्ये द्रव्य (म्ह. आहारदान) रूपी पेरलेलें बी (म्ह. केलेले शुभकर्म) विशुद्ध श्रद्धेचे पाणी घातल्याने इहलोकीं आणि परलोकीं अनंत (म्ह. चांगलें) फळ देतें.

९ म्हणून येथे यावेळेला योग्य असें कुम्मास मी या (श्रेष्ठ मुनी) सच देतो. कारण या गांवात अनुव्रती श्रावक (श. दाते) नाहीत. आणि हा महात्मा कांही घरामध्येच दर्शन देऊन (म्ह. भिक्षेकरितां हिंडून) (कांहीं न मिळतां) परत फिरेल. पण मी दोन-तीन वेळ फिरेन. तेव्हा मला पुनः (कांही) मिळेल. (शिवाय) जवळच दुसरा एक गांव आहे. तेव्हा मी हें सर्व (कुम्मास यास) देतों." त्यावेळीं नमोस्तु करून त्याने भगवंतास (भक्तिभावाने) कुम्मास अर्पण केलें. मुनीनेहि त्याच्या (मनाचा) शुद्ध परिणाम पाहून आणि द्रव्य (म्ह. आहार) शुद्धि जाणून, "हे धर्मशील (भद्र), थोडेसे दे," असें म्हणून (भिक्षा) पात्र (पुढे) धरलें. उत्तम परिणाम वाढत असतांना त्याने (आहार दान) दिलें, तो म्हणाला,

१५) "भाग्यवान् माणसांचे कुम्मास साधूंच्या उपवास सोडण्या-करितां (उपयोगी) होतात."

१०. इतक्या अवधींत अंतराळांत राहून मुनिभक्तपरायण देवतेने मूलदेवाच्या भक्तीने आनंदित होऊन म्हटलें, "वत्स मूलदेव, तूं चांगली गोष्ट केलीस. तेव्हा या गाथेच्या दुसऱ्या चरणाने जें तुला आवडेल तें माग, म्हणजे मी तें सर्व पुरें करते." मूलदेवाने विनविलें,

"देवदत्ता वारवनिता, सहस्त्र गजवर आणि राज्य (दे)."

देवतेने म्हटलें, "वत्स, निश्चित ऐस. साधुचरणाच्या प्रभावाने लौकरच ही (तुझी मनीषा) निःसंशय पुरी होईल." मूलदेव म्हणाला, "भगवती, असेच होऊं देत." नंतर मुनीस वंदन करून तो परतला आणि मुनीहि उद्यानाकडे गेले. मूलदेवाने दुसरी भिक्षा मिळवली तो जेवला आणि वेणातटाकडे निघाला व हळु हळु त्या ठिकाणीं पोहोचला.

११. रात्री तो (नगरा) बाहेरील धर्मशाळेमध्ये झोपला. शेवटच्या प्रहरी उज्ज्वल तेजाने (तळपणारा) पूर्णगोलाकार चंद्र पोटामध्ये शिरलेला

स्वप्नात पाहिला. दुसऱ्या एका भिकाऱ्याने पण तेंच स्वप्न पाहिलें आणि त्याने तें दुसऱ्या भिकाऱ्यांना सांगितलें. त्यांच्यापैकी एकाने म्हटलें, "आज तुला तूप गूळ घातलेली मोठी भाकरी मिळेल" यांना स्वप्नाचा खरा अर्थ कळत नाही, असा विचार करून मूलदेवाने त्यांना (आपलें स्वप्न) सांगितलें नाही. भीक मागण्याकरितां गेला असतांना घरशेकरणी करावयाच्या वेळीं त्या भिकाऱ्याला आगोदर सूचित केल्याप्रमाणे भाकरी मिळाली. संतुष्ट होऊन त्याने भिकाऱ्यांना हें सांगितलें. मूलदेव पण एका बागेमध्ये गेला. फुलें गोळा करण्यांत मदत करून त्या ठिकाणीं त्याने माळचाला आपलेसे केलें. त्याने त्याला फुलें आणि फळें दिलीं. तीं घेऊन स्नान करून (शुद्धान्तः-करणाने) तो स्वप्नशास्त्र जाणणाऱ्याच्या घरीं गेला. त्याने त्यास नमस्कार केला. त्याने क्षेमकुशल विचारलें. त्यानेहि मोठ्या आदराने त्याच्याशीं संभाषण केलें, आणि (येण्याचें) कारण विचारलें. आपले दोन्ही हात जोडून मूलदेवाने स्वप्नाची हकिगत सांगितली. उपाध्यायहि हर्षित होऊन म्हणाला, "शुभ मुहुर्तावर स्वप्नाचें फल सांगेन. तोपर्यंत आज आमचा पाहुणा हो." मूलदेवाने कबूल केलें. त्याने स्नान केलें आणि मोठ्या थाटाने भोजन आटोपलें. जेवण झाल्यावर उपाध्याय म्हणाला, "वत्स, ही माझी मुलगी उपवर झाली आहे. तेव्हा माझ्या विनंतिनुसार तिच्याशीं विवाह कर." मूलदेवाने विचारलें, "तात, कुल-शील माहित नसताना मला जावई कसे करता?" उपाध्यायाने म्हटलें, "बाळ, सांगितले नसतांना देखील (चांगल्या) वागणुकीनेच तुझें कुलवान घराणें समजून आलें. असें म्हटलें आहे-

१६) आचरणाने घराण्याचा बोध होतो, बोलण्याने देश ओळखला जातो, चलबिचल झाल्याने त्याचें प्रेम उघडकीला येतें आणि शरीराची ठेवण (तो कोणत्या तऱ्हेचें) अन्न (खातो हें) सुचवितें.

त्याचप्रमाणे,

१७) कमलिनींना सुगंधित कोण करतो? ऊसास गोडी कशामुळे येते? गजवरांना लालित्यपूर्ण चाल कोणाकडून मिळाली

आहे ? उत्तम घराण्यांत जन्मलेल्यास नम्रता कोणी शिकवली आहे ?

अथवा

१८) जर गुण नसतील तर उत्तम कुलाचा काय उपयोग ? गुणी माणसाला खरोखर कुलवान घराण्याशीं कांही कर्तव्य नाही. गुण नसलेल्यास निष्कलंक कुल हाच मोठा डाग आहे."

१२. अशातऱ्हेच्या बोलण्याने त्याने त्यास (आपलें म्हणणें) कबूल करावयास लावलें आणि उत्तम मुहूर्तावर (आपल्या मुलीचें) पाणिग्रहण करावयास लावलें. (तसेंच) "सात दिवसांत तूं राजा होशील," असें स्वप्नाचें फळ सांगितलें. तें ऐकून त्याचें हृदय आनंदाने भरून गेलें पांचव्या दिवशीं तो नगराबाहेर गेला आणि चंपक (झाडा)च्या सांवलींत झोपला.

१३. आणि इकडे त्या नगरीतील राजा निपुत्रिक मरण पावला. (राजाची निवड करण्याकरितां) पांच दिव्यें (हत्ती, घोडा, कलश, चवरी आणि छत्र) अभिषिक्त केलीं. नगरामध्ये फिरून तीं (दिव्यें) बाहेर आलीं आणि मूलदेवाजवळ पोहोचलीं. (सूर्य पश्चिमेला कलला असतांना देखील) न बदललेल्या सावलीखाली तो दिसला. त्याला पाहून हत्तीने गर्जना केली, घोडा खिंकाळला, कलशाने अभिषेक केला, चवऱ्या ढळूं लागल्या आणि छत्र त्याच्यावर राहिलें. तेव्हा लोकांनी जयजयकार केला. हत्तीने त्यास पाठीवर चढविलें आणि नगरामध्ये नेलें. मंत्री, सामंतांनी त्याचा राजाभिषेक केला. नभस्तलांत राहून देवतेने म्हटलें, "अहो, हा श्रेष्ठ मनुष्य संपूर्ण कलेचा धारक देवतेने ज्याचे शरीर तयार केले आहे असा विक्रमराज नांवाचा राजा आहे. तेव्हा याच्या आज्ञेनुसार जो वागणार नाही त्याला मी क्षमा करणार नाही." तेव्हा सर्वच सामंत, मंत्री, पुरोहितादि परिजन त्याची आज्ञा पाळू लागले. तेव्हा तो उत्तमोत्तम वैषयिक सुखांचा उपभोग घेऊ लागला. उज्जयिनी नरेशाचा विचारधवलाशीं व्यवहार सुरू झाल्यानंतर त्या दोघांत निस्सीम मैत्री जडली.

१४. आणि इकडे मूलदेवाचा तशाताहेने मानभंग झालेला पाहून देवदत्तेला अचलाविषयीं अत्यंत तिरस्कार वाटला. त्यावेळीं तिने अचलाची निर्भत्सना केली, "अहो, मी आहे वेश्या, मी (कांही) तुमची लग्नाची बायको नव्हे! तरी पण माझ्या घरीं येऊन अशातऱ्हेने वागता? तेव्हा यापुढे माझ्या बाबतींत त्रास घेऊं नये." असें म्हणून ती राजापाशीं गेली. त्याच्या पायावर लोटांगण घालून तिने विनविलें, "महाराज, (आपल्याकडे राखून ठेवलेल्या) त्या वराने माझ्यावर कृपा करा." राजाने म्हटलें, सांग, तुझ्यावर मी कृपा केलेलीच आहे. आणखी (तुला) कायं म्हणावयाचे आहे?" देवदत्तेने सांगितलें, "तर प्रभु, मूलदेवाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि पुरुषाचें (रंजन करण्याची) मला आज्ञा होऊं नये. (तसेंच) या अचलास माझ्या घरीं येण्याची बंदी करावी." राजाने समजाविले, "ठीक, जशी तुझी इच्छा. पण याबाबतींतील हकिगत तरी सांग." तेव्हा माधवीने (घडलेला सर्व वृत्तांत) सांगितला. राजा अचलावर कोपला आणि म्हणाला, "अरे या शहरांतील ही दोन रत्नें आहेत, आणि हा (तर) त्यांनाहि गालबोट लावतो आहे." नंतर त्यास बोलावून (राजाने) त्याची निर्भत्सना केली आणि म्हटलें, "अरे, तूं काय येथील राजा आहेस, म्हणून अशातऱ्हेने वागतोस? तेव्हा आतां शरण पहा. मी तुला ठार करणार आहे." देवदत्तेने विनविलें, "प्रभु, कुत्र्यासमान असलेल्या याला मारून काय मिळणार आहे? तेव्हा सोडून द्या याला!" राजाने म्हटलें, "अरे, या भद्रेच्या शब्दामुळेंच आतां तूं सुटला आहेस. पण त्या (मूलदेवा) ला येथें आणल्यानंतरच (तुझ्या पापाची) शुद्धी होईल. "तेव्हा चरणावर पडून तो राजवाड्यांतून निघाला. सर्व दिशांना त्याने त्याचा शोध केला तरी देखील तो सांपडला नाही. त्यावेळीं केवळ याच उणीवीने जहाजामध्ये माल भरून तो पारसकुलाकडे निघाला.

१५. आणि इकडे मूलदेवाने देवदत्तेला आणि त्या राजाला पत्र व भेटी पाठविल्या. त्याने राजाला (पत्रांत) म्हटलें, "या देवदत्तेवर माझें अतिशय प्रेम आहे. तेव्हा जर तिला तें आवडेल आणि तुम्हालाहि पसंत पडेल तर कृपा करून तिला (माझ्याकडे) पाठवा." त्यावेळीं राजाने

प्रतिहारींना म्हटलें, "अरे, विक्रम राजाने हें अशातऱ्हेने का लिहविलें आहे ? आमच्यांत आणि त्यांच्यांत कांही फरक आहे का ? सर्वच राज्य जर त्यांचे आहे, मग देवदत्तेचे काय ? तरी तिच्या इच्छेप्रमाणे होऊं दे." नंतर देवदत्तेला बोलावण्यांत आले. त्याने तिला हकिगत सांगितली. "तेव्हा जर तुला आवडत असेल तर त्याच्याकडे जा." तिने म्हटलें, "आपली ही मोठीच कृपा ! आपल्या अनुज्ञेने माझे हे मनोरथ (पूर्ण होतील)." मोठ्या थाटाने तिचा सत्कार करून तिला पाठविलें आणि ती निघून गेली. त्यानेहि मोठ्या वैभवाने तिला नगरांत आणलें. (अशा तऱ्हेने) त्यांचें एक राज्य झालें. मूलदेव तिच्या सांगातीं वैषयिकसुखाचा उपभोग घेत राहिला आणि जिनालयें (बांधविण्यामध्ये) (तीर्थंकर) प्रतिमा स्थापण्यामध्ये आणि त्यांची पूजा करण्यामध्ये तो मग्न झाला.

१६. इकडे तो अचल पारसकुलामध्ये पुष्कळ द्रव्य मिळवून आणि उत्तम मालाने (जहाज) भरून बेणातटीं आला आणि (नगरा) बाहेर त्याने निवास केला. त्याने लोकांना विचारलें, "येथील राजाचें नांव काय ?" त्यांनी सांगितलें, "विक्रमराजा". तेव्हा सुवर्ण, मोहरा आणि मोत्यांनी ताट भरून तो राजाच्या भेटीस गेला. राजाने त्यास आसन देवविलें. तो बसला आणि (मूलदेवाने) त्यास ओळखलें. परंतु अचलाला त्याची ओळख पटली नाही. राजाने विचारलें, "शेडजी, कोठून आलांत ?" त्याने म्हटलें, "पारसकुलाहून." राजाकडून सन्मान झालेल्या अचलाने म्हटलें, "महाराज, कोणातरी अधिकाऱ्याला मालाची पहाणी करण्याकरता पाठवा." तेव्हा राजाने म्हटलें, "मी स्वतःच येतों." त्यावेळीं तपासनीस अधिकाऱ्यांना घेऊन राजा निघाला. त्याने जहाजामध्ये असलेला शंख, सुपारी, चंदन, अगरु, मंजिष्ठ, इत्यादि माल दाखविला. राजाने तपानिसा-समोर विचारलें. "हे शेडजी, हें एवढेंच आहे का ?" त्याने सांगितलें, "एवढेच आहे, महाराज !" राजाने म्हटले, "यांतील शेडजीला अर्धे द्या, पण माझ्यासमोर या पेटच्या तोला." अधिकाऱ्यांनी त्या तोलल्या. मालाच्या भाराने, लाथेच्या प्रहाराने, त्रेळू भोंकसून मंजिष्ठादिमध्ये असलेला मौल्यवान माल त्यास दिसला. राजाने पेटचा उघडावयास लावलें. त्यांची

बारकाईने तपासणी केली आणि कांही ठिकाणीं सोनें, कांही ठिकाणीं रूपें, कोठें रत्नें, मौक्तिक आणिं पोवळें अशा तऱ्हेचा मौल्यवान माल दृष्टीस पडला. ते पाहून क्रोधाविष्ट झालेल्या (राजाने) आपल्या सेवकांना आज्ञा दिली, "अरे साक्षात चोर असलेल्या याला पकडा (श. बांधा)." त्यांनी हृदय थरारत असलेल्या त्याला बांधलें. जहाजांवर रखवालदार ठेवून राजा राजवाड्याकडे परतला. कोतवालाने त्याला पण राजासमोर आणलें, त्याला घट्ट बांधलेले पाहून राजाने म्हटलें, "अरे सोडा, सोडा याला" त्यांनी (त्यास) सोडलें. राजाने विचारलें, "मला ओळखलेस का?" त्याने म्हटलें, "सगळ्या पृथ्वीमंडळामध्ये प्रसिद्ध असलेल्या महाराजांना कोण ओळखणार नाही?" राजाने म्हटलें, "पुरे हे औपचारिक बोलणें! जर माहीत असेल तर स्पष्ट सांग." अचलाने म्हटलें. "प्रभु, चांगली ओळख पटली नाही." त्यावेळीं राजाने देवदत्तेला हांक मारली. सुंदर अप्सरेप्रमाणे सर्वांग विभूषित झालेली ती (तेथे) आली. अचलाने तिला ओळखलें. तो मनामध्ये अत्यंत शरमिंदा झाला. तिने म्हटलें, "अरे, हे आहेत मूलदेव, की ज्यांना तूं त्यावेळीं म्हणाला होतास, "कधीकाळीं दैववशात संकटांत सांपडलों असताना माझ्यावरहि (असाच) उपकार करावा. तेव्हा हाच तो प्रसंग. दीनदुबळ्या लोकांविषयीं वात्सल्यप्रेम असलेल्या राजाने आतां संपत्ति व जीवनाविषयीं भयाने आकूल झालेल्या तुझी सुटका केली आहे." तें ऐकून मनामध्ये लज्जित होऊन "मोठी कृपा झाली", असें म्हणून त्याने राजाच्या व देवदत्तेच्या पायावर लोळण घातलें आणि म्हटलें, "सर्व लोकांना सुखी करणाऱ्या, संपूर्ण कला (नैपुण्या) ने सुशोभित झालेल्या आणि निर्मल स्वभावाच्या महाराजांना मी त्यावेळीं राहु दैत्याने पूर्णेदूस ग्रासावें त्याप्रमाणे त्रास दिला होता. तेव्हा महाराजांनी त्याची मला क्षमा करावी. आपणास पीडा दिल्यामुळे क्रोधाविष्ट झालेल्या (विचारधवल) महाराजांनी पण उज्जयिनीमध्ये येण्यास बंदी केली आहे." मूलदेवाने म्हटलें, "राणीने तुझ्यावर कृपा केल्यामुळे मी तुला क्षमा केलीच आहे." त्यावेळीं पुनः मोठ्या आदराने त्याने दोघांच्या पायावर लोटांगण घातलें. देवदत्तेने त्यास स्नान करावयास लावून मौल्यवान वस्त्रें परिधान

करावयास दिलीं. राजाने कर माफ केला आणि त्यास उज्जयिनीस पाठविलें. मूलदेवराजाच्या विनंतिनुसार विचारधवलाने (हि) त्यास क्षमा केली. निर्घृणशर्माहि मूलदेव राज्यावर बसलेला आहे हें ऐकून बेणातटीं आला. त्याने राजास पाहिलें. कसली सेवा केली नसतांनाहि राजाने त्यास तोच (वीरनिधान) गांव (इनाम) दिला. प्रणाम करून आणि "मोठी कृपा झाली," असें म्हणून तो आपल्या गांवी गेला.

१७. आणि इकडे त्या भिकाऱ्याने असें ऐकलें, "आपल्याप्रमाणेच मूलदेवानेहि असेंच स्वप्न पाहिलें होतें. पण त्या (स्वप्ना)चा (योग्य) अर्थ सांगितल्यावरून त्याचें फळ म्हणून तो राजा झाला. त्याने विचार केला, "दूध असलेल्या ठिकाणीं जाऊन तें पिऊन मी झोपेन म्हणजे तें स्वप्न पुनः मी पाहीन." तो कदाचित् तें (स्वप्न) पाहीलहि, पण मनुष्यजन्म (पुन्हा) मिळण्याची शक्यता नाही.

□ □ □

३. करकंडु

१. चंपापुरीमध्ये दधिवाहन राजा होता. चेटक (राजा) ची कन्या पद्मावती ही त्याची राणी. एकदा तिला डोहाळे लागले, "राजवस्त्रें परिधान करून, उत्तम हत्तीच्या पाठीवर बसून, महाराजांनी (माझ्यावर) छत्र धरलें असतांना मी वनोपवनांत कसा विहार करू शकेन ?" ती उदास झाली. राजाने विचारलें. तिने आपली इच्छा (श. खरी गोष्ट) निवेदन केली. तेव्हा राजा आणि ती जय हत्तीवर आरूढ झालीं. राजाने (तिच्यावर) छत्र धरलें. ती बागेंत गेलीं. त्यावेळीं नुकताच पावसाळा (सुरूं झाला) होता. सुगंधित मातीच्या शीतल सुवासाने भारल्यामुळे हत्तीस वनाची आठवण झाली. हत्तीहि वनाकडे तोंड करून निघाला आणि त्याने रस्ता सोडला. लोकांना त्यांच्या मागून जाणें शक्य झाले नाही. (राजा, राणी)

दोघांनींहि अरण्यात प्रवेश केला. राजाने वडाचें झाड पाहिलें आणि राणीस म्हटलें, "हत्ती या वडाखालून जाईल, तेव्हा तूं फांदी धरावीस." तिने तें कबूल केलें, (पण) ती धरूं शकली नाही. राजा दक्ष होता, त्याने फांदी धरली. तो खालीं उतरला, आणि आनंदरहित व किंकर्तव्यमूढ होऊन चंपा (नगरी) स परत गेला.

२. (हत्तीने) पद्मावतीला निर्जन अरण्यांत नेलें. तहानेला झाला त्यावेळीं हत्तीला एक मोठें तलाव दिसलें. मग तो तेथे उतरून क्रीडा करूं लागला. ती पण हळुं हळुं हत्तीवरून उतरली व तलावांतून बाहेर आली. तिला दिशा समजल्या नाहीत. घाबरून जाऊन तिने त्या अरण्यांत चोहोकडे दृष्टी फिरवली. त्यावेळीं, "हाय! काय हा कर्माचा परिणाम की ज्यामुळे कल्पना देखील करवत नाही अशा (या) वनांत मी पडलें आहे! तेव्हा काय करूं मी? कोठे जाऊं? काय माझी दशा होईल?" अशा (विचाराने) निराधार झालेली ती रडू लागली. क्षणभरांतच धीर धरून ती विचार करू लागली, "अनेक हिंस्र पशूंनी भरलेल्या या भयानक अरण्यांत काय होईल तें सांगता येत नाही. म्हणून मला दक्ष राहिले पाहिजे (श. मी दक्ष रहाते.)" नंतर ती (अरहंत, सिद्ध, साधु आणि धर्म) या चार (आश्रयांना) शरण गेली, (आपण केलेल्या) वाईट कर्मांची तिने निंदा केली, सर्व प्राणिमात्रांना क्षमा केली आणि साकारपूर्वक अन्नाचा त्याग केला. (ती म्हणाली)–

१) "जर माझ्याकडून यावेळीं या शरीराच्या बाबतींत कांही चूक झाली असेल तर या शेवटच्या क्षणीं मी अन्न, परिग्रह आणि देहाचा त्याग करतें.

त्याचप्रमाणे पंच नमस्कार (मंत्रच आतां) मला शरण आहे. कारण तोच इहलोकीं आणि परलोकीं हितावह आहे. असें म्हटलें आहे–

२) नवकार महामंत्राने रोग, पाणी, अग्नी, चोर, सिंह, हत्ती, युद्ध, साप यापासूनचीं भयें त्याचक्षणीं नाश पावतात.

३) डाकीण, वेताळ, राक्षस, महामारी यांच्या भयाचा प्रभाव

किंचितहि त्याच्यावर होत नाही. नवकार (मंत्रा) च्या प्रभावाने सर्व संकटें नाहीशी होतात.

त्याच प्रमाणे

४) ज्यांच्या हृदयरूपी गृहेमध्ये नवकारमंत्ररूपी सिंह सदासर्वकाळ वास करतो आहे, त्यांच्यावर अष्टकर्मग्रंथीरूपी हत्तीचा हल्ला झाला (तरीहि) त्याचाच निःपात होतो."

३. तेव्हा नवकारमंत्राचा जप करीत ती एका दिशेने जाऊ लागली. दूर अंतर चालून गेल्यावर तिला एक तपस्वी दिसला. त्याच्या (चरणा) जवळ जाऊन तिने त्यास नमोस्तु केला. त्याने विचारलें, "माते तूं इकडे कोठून आलीस ?" तेव्हा तिने सांगितलें, "मीं चेटक राजाची मुलगी. ... मला हत्तीने (येथे) आणलें आहे." तो तपस्वी चेटक (राजा) चा प्रजानन होता. त्याने तिचें सांत्वन केलें, "भीऊ नको," आणि तो म्हणाला, "नको दुःख करूस. मीलन–विरहाचें कारण असलेला, जन्म, मरण, रोग, दुःखाने भरलेला अशा तन्हेचा हा असार संसार आहे." तिची इच्छा नसतानाहि त्याने वनांतील फळांनी तिला प्राण धारणा करावयास लावली. त्याने तिला आश्रमांत नेलें आणि म्हटलें, "येथपासून नांगरलेली जमीन आहे, ती आम्ही चालून जात नाही. हा दंतपुराचा प्रदेश आहे. येथे दंतवक्र राजा आहे. तेव्हा तूं निर्धास्तपणे या शहरांत जा. पुन्हा चांगला तांडा (सोबत) पाहून तूं चंपानगरीस जावेस." तपस्वी परत फिरला. ती (श. दुसरी) पण दंतपुरांत गेली. विचारीत ती साध्वीपाशी गेली. तिने प्रवर्तिनीला (म्ह. प्रमुख साध्वीला) वंदन केलें. तिने विचारलें, "हे श्राविके, तूं कोठून आलीस ?" तिने घडलेलें सर्व सांगितलें. ती रडूं लागली, प्रवर्तिनीने किंचित् सांत्वन केलें, "भद्रे, मनांत खेद बाळगूं नको. खरोखर नशिबाचा परिणाम टाळणें कठीण आहे. कारण,

५) विधी एकत्र आलेल्यांना दूर करतो आणि खरे म्हणजे वियोगितांमध्ये मीलन घडवून आणतो; जीवांना सुखदुःख देण्यामध्ये तो अत्यंत प्रविण आहे.

आणि पुनः–

६) क्षणांत वैभव दिसणाऱ्या आणि नाहीसें होणाऱ्या, क्षणमात्रांत अनेक प्रकारचीं सुखदुःखें पालटणाऱ्या आणि क्षणभरांतच मीलन व विरह होणाऱ्या या संसारामध्ये कांहीसुद्धा सुख नाही.

७) जेणेकरून हा संसार अनेक प्रकारच्या दुःखाचें आगर आहे, त्याच करितां येथे (संसारात) शहाणी माणसें निर्वाणाचा मार्ग अवलंबितात."

अशा तऱ्हेने उपदेशिल्यावर तिला (संसाराविषयीं) विरक्ती (व धर्माविषयीं प्रेम) उत्पन्न झालें आणि तिने तिच्याच (चरणा) जवळ (आर्जिकेची) दीक्षा घेतली. विचारलें असतांनाहि दीक्षा दिली जाणार नाही या भयाने तिने गर्भाविषयीं सांगितलें नाही. नंतर प्रवर्तिनीला (ही गोष्ट) कळून आल्यावर तिने (सर्व) खरी हकिगत सांगितली. तिला गुप्त ठेवलें. प्रसूत झाल्यावर नांव असलेली आंगठी आणि रत्नकंबलासह (त्या बालकास) स्मशानांत सोडलें. त्यानंतर स्मशानरक्षकाने त्यास घेतलें, बायकोकडे दिलें. त्यांनी (त्याचें) अवकीर्णक (सापडलेला) असें नांव ठेवलें. त्या आर्यिकेने त्या चांडाळस्त्रीशीं मैत्री केली. बाकीच्या आर्यिका त्या साध्वीस विचारू लागल्या, "मूल कोठे आहे?" तिने सांगितलें, "मेलेलें जन्मलें, म्हणून मी टाकून दिलें." तो (बाळ) तेथे लहानाचा मोठा होऊं लागला. त्यावेळीं तो दुसऱ्या मुलाशीं खेळू लागला. तो त्या मुलांना म्हणू लागला, "मी तुमचा राजा आहे, मला कर द्या." त्याला वाळळी खरूज झाली. तो त्यांना म्हणे, "मला खाजवा." तेव्हा त्यांनी त्याचें "करकंडू" असे नांव पाडलें. त्याला त्या साध्वीचा (फार) लळा लागला. ती त्याला मोदक किंवा जी गोडधोड भिक्षा मिळे ती देई.

४. मोठा झाल्यावर तो स्मशानाची राखण करूं लागला. त्याठिकाणीं दोन मुनी कांही कामाकरितां त्या स्मशानांत आले, आणि एका जागीं वेळूच्या झुडुपांत त्यांना एक काठी दिसली. त्याच्यापैकी एकटा काठीचीं लक्षणें जाणत होता, ती अशी–

८) एक पेर असलेली (काठी) स्तुति करणारी आहे, दोन पेर असलेली भांडण निर्माण करते, तीन पेराची फायदा करून देते आणि चार पेराची मरणाकडे नेणारी आहे.

९) पांच पेर असणारी काठी रस्त्यामधील भांडण सोडवणारी आहे, सहा पेराची रोगमय आहे, सात पेर असलेली आरोग्यदायक आहे.

१०) चार बोटें तळाला रुंद व आठ बोटें (प्रत्येक पेर) लांब असणारी, सात पेराची काठी मदोन्मत हत्तीचें निवारण करते.

११) आठ पेराची अपयश आणते, नऊ पेराची कीर्ति मिळवून देणारी आहे आणि त्याचप्रमाणे दहा पेराची सर्व वैभवदायी आहे.

१२) वाकडी, किड्यांनी खाल्लेली, ठिपके असलेली, पोकळ, जळलेली आणि शेंड्याला वाळलेली काठी प्रयत्नपूर्वक टाळावी.

१३) मजबूत पेर असलेली, तेलकट (वर्ण) असलेली, रंगाने एकाच रंगाची जशा तऱ्हेच्या लक्षणांनी परिपूर्ण असलेली काठी उत्तम समजावी

त्यावेळीं तो म्हणाला, "जो ही काठी घेईल तो राजा होईल, पण आणखी चार बोटें वाढेपर्यंत वाट पाहिली पाहिजे म्हणजे योग्य होईल." तें त्या चांडाळपुत्राने आणि एका ब्राह्मणाने ऐकलें. त्या ब्राह्मणाने वर न वाढलेली ती (काठी) चार बोटें खणून कापली. त्या मुलाने त्याला पाहिलें आणि (त्यापासून) ती हिसकावून घेतली. त्या ब्राह्मणाने त्याला न्यायालयांत नेलें. तो म्हणाला, "काठी दे". त्याने सांगितलें, "ही माझ्या स्मशानांत वाढली आहे, म्हणून मी देत नाही" ब्राह्मणाने म्हटलें, "दुसरी घे." त्याने नाकारलें, आणि म्हटलें, "मला या (काठी)शींच कर्तव्य आहे." त्या मुलाने ती दिली नाही. त्या (न्यायाधिशां)नी मुलास विचारलें, "का देत नाहीस?" तो म्हणाला, "मी या काठीच्या प्रभावाने राजा होणार आहे." तेव्हा न्यायाधीश हंसून म्हणाले, "ज्यावेळी तूं राजा होशील तेव्हा तूं यास एक गांव द्यावेस." त्याने कबूल केलें. "याला मारून काठी घेऊया," असे तोहि ब्राह्मण दुसऱ्या ब्राह्मणांना सांगू लागला तें त्याच्या पित्याने ऐकलें. तीं तिघेहि नाहीशी झालीं आणि कांचनपुरास गेलीं. तेथील राजा निपुत्रिक मरण पावला. (राजाची निवड करण्या–

करितां) घोडा शृंगारला. (नगरा)बाहेर झोंपलेल्या त्या (करकंडु)च्या जवळ येऊन प्रदक्षिणा घालून तो उभा राहिला. नागरिकांनी (उत्तम) लक्षणांनी संपन्न असलेल्या त्याच्याकडे आदराने पाहिलें. त्यांनी जयघोष केला. मांगलिक वाद्यें वाजू लागली. तोहि जांभई देत उठला. निःशंकपणे तो घोड्यावर आरूढ झाला, त्याला (नगरामध्ये) नेलें. चांडाळ म्हणून ब्राह्मण त्यास प्रवेश करूं देईनात. त्यावेळीं त्याने ती उत्तम काठी (हातांत) घेतली. ती प्रज्ज्वलित होऊं लागली. ते भयभीत झाले. नंतर त्याने वाटधानकांतील शूद्रांना ब्राह्मण केलें. असें म्हटलें आहे,

१४) दधिवाहनपुत्र करकंडुराजाने वाटधानकांत रहाणाऱ्या चांडाळांना ब्राह्मण केलें

त्याचें घरांतील अवकीर्णक नांव सोडून देऊन मुलांनी ठेवलेलें करकंडु हेंच नांव प्रचारांत आणलें. त्यावेळीं तो ब्राह्मण आला (व म्हणू लागला) "मला (सांगितल्याप्रमाणे) गांव द्या." तो म्हणाला, "जें तुला आवडेल तें घे." त्याने सांगितलें, "माझें चंपानगरींत घर आहे, तेव्हा त्याच प्रांतांतील (गांव) द्या." तेव्हा त्याने दधिवाहनास पत्र दिलें, "मला (आपल्या देशांतील) एक गांव द्या, मी तुम्हांला जें गांव किंवा नगर पाहिजे असेल तें देतों." तो रागावला, "हा दुष्ट चांडाळ स्वतःला जाणत नाही." परत आलेल्या दूताने सांगितलें. करकंडु रागावला. त्याने चंपानगरीस वेढा घातला. युद्ध सुरूं झालें. त्या साध्वीने ऐकलें. माणसांची (विनाकारण) हत्त्या होऊ नये म्हणून प्रवर्तिनीला विचारून ती त्या नगरीस गेली. करकंडूस बाजूस नेऊन तिने गुपित फोडलें, "हा तुझा पिता आहे." त्याने त्या (चांडाळ) मातापित्यांना विचारलें. त्यांनी खरी हकिगत सांगितली. (पण) अभिमानाने तो मागे फिरला नाही. तेव्हा ती चंपानगरींत गेली. राजाच्या प्रासादांत आली. (सर्वांनी) तिला ओळखलें. पायावर पडून दासी रडू लागल्या. राजानेहि ऐकलें, तो पण आला. वंदन करून व (बसावयास) आसन देऊन त्याने गर्भा-विषयीं विचारलें. तिने सांगितलें "हाच तो ज्याने नगरीला वेढा घातला आहे." आनंदित होऊन तो निघाला आणि (त्यास) भेटला. दोन्हीहि राज्यें त्यास देऊन दधिवाहनाने मुनिदीक्षा घेतली.

५ करकंडु मोठा शासनकर्ता झाला. खरोखर तो गोपुरप्रिय होता. त्याचीं पुष्कळ गोपुरें होतीं. शरदऋतुमध्ये त्याने एक मजबूत अवयव असलेलें पांढरे गायीचें वासरू पाहिलें. तो म्हणाला, याच्या मातेची धार काढू नका. ज्यावेळीं मोठा होईल त्यावेळीं (पण) याला दुसऱ्या गायीचें दूध पाजवावे. त्या गोपाळांनी (आज्ञा) मान्य केली. तो मोठ्या शिंगांचा उत्तम बैल झाला. राजाने त्यास पाहिलें. तो केवळ झुंज करण्यांत मग्न असे. पुन्हा कांही काळाने राजा आला, त्याने पाडयाकडून त्रस्त केला जात असलेला विशाल देहाचा म्हातारा बैल पाहिला. त्याने गोपाळांना विचारलें, "तो बैल कोठे आहे ?" त्यांनी (दयनीय) अवस्थेस पोहोंचलेल्या त्या (बैला)स दाखविलें. असें म्हटलें आहे–

१५,१६) ज्याच्या जोराच्या हंबरण्याने तीक्ष्ण शिंगें असलेले, गर्वोन्मत्त, बलशाली व समर्थ बैलहि गोठ्याच्या अंगणांत (इकडे तिकडे) पांगत असत; तोच हा पूर्वीचा उन्माद नाहीसा झालेला, गळत असलेल्या डोळ्यांचा व थरथरत असलेल्या विषम ओठांचा बैल (आतां) पाडयांचा हल्ला सहन करीत आहे.

६. तशा स्थितींत त्यास पाहून तो उदास झाला. अनित्यत्वाचा तो विचार करू लागला. "हाय! तशा प्रकारचा (बलिष्ठ) होऊन आतां हा बैल अशातऱ्हेने (दुर्बळ) झालेला आहे. तेव्हा संसारांतील सर्व वस्तू क्षणभंगुर आहेत. त्याचप्रमाणे, खरोखर, सुखोपभोगास कारणीभूत असणारी आणि मोठ्या मोहाचे कारण अशी संपत्ति (पण) अस्थिर आहे. असें म्हटलें आहे–

१७) इंद्रधनुष्याप्रमाणे चपल असणारी, विजेच्या चमकण्याप्रमाणे चंचल असणारी व पायाला चिकटणाऱ्या धुळीप्रमाणे असलेली संपत्ति अस्थिर स्वभावाची आहे.

१८) चोर संपत्ति लुटतात, राजे ती जबरीने घेतात, व्यंतरदेव ती दडवतात व नातेवाईक ती गिळंकृत करतात.

१९) अग्नि सर्व जाळतो, पाण्याचा पूर नष्ट करतो आणि रागावलेला यम सर्वच अपहार करतो.

त्याचप्रमाणे अत्यंत आनंदाचें कारण असलेलें प्रिय माणसाशीं झालेलें मीलनहि क्षणभंगुर आहे. कसें ?

२०, २१, २२) ज्याप्रमाणे सायंकाळीं पुष्कळ पक्षी झाडावर एकत्र येतात, आणि ज्याप्रमाणे परदेशास गेलेले प्रवासी धर्मशाळेंत भेटतात, पण सकाळीं सर्वजण निरनिराळ्या दिशेस जातात; त्याचप्रमाणे पुष्कळ जीवहि कुटुंबामध्ये एकत्र येतात, पण (केलेलें शुभाशुभ) कर्म बरोबर घेऊन ते सर्वजण मृत्यूच्या प्रातःकाळीं देव, मनुष्य, तिर्थंचादि (म्ह. आणि नरक) गतीरूपी निरनिराळ्या दिशेस जातात.

तसेंच,

२३) ज्यामुळे मनुष्य उन्मत्त आणि प्रमत्त होऊन अनेक माणसांच्या परिवारांत शहरांतील रस्त्याने (जात) मोडतोड करत हिंडतो, तेंच क्षणभंगुर असलेलें तारुण्य लौकरच म्हातारपण आणि रोगांनी शुष्क बनतें आणि जतन करीत असतांनाहि नष्ट होतें.

पुनः

२४) जीव गर्भात असतांना, जन्मल्यावर, बालपणीं, तारुण्यांत, म्हातारपणीं सर्व अवस्थेमध्ये मातीच्या घटाप्रमाणे नाश पावतात."

अशातऱ्हेने चिंतन करीत असताना ज्ञान प्राप्त होऊन तो प्रत्येकबुद्ध झाला. पंचमुष्ठींनी केशलोच करून देवतांनी दिलेलीं (मुनि) उपकरणें घेऊन तो विहार करू लागला. असें म्हटलें आहे–

२५) धवल, उत्तम जातीचा, चांगल्या आकारांच्या शिंगाचा बैल गोठ्यामध्ये पाहून वैभव आणि विपन्नावस्था यांचे चिंतवन करून कलिंगराजाने (मुनि) धर्माचा अंगिकार केला. (श. धर्माचें निरीक्षण केलें)

□ □ □

प्रकाशिका :

सौ. सुचेता माधव रणदिवे,

गिते बिल्डिंग,

५७, रविवार पेठ,

सातारा शहर.

• • •

मुद्रक :

म. सं. यादव,

नॅशनल प्रिंटिंग प्रेस,

१०९, शुक्रवार पेठ,

सातारा शहर.

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण:—

प्रा. मा. श्री. रणदिवे, एम्.ए.

गिते बिल्डिंग,

५७, रविवार पेठ, सातारा शहर.